RNI No.: MAHBIL/2016/68485

www.acrossstates.com

पोस्टाचा परवाना क्र. MNW/335/2018-20

**प्रदूषण: बुलेट ट्रेन, मेट्रोसह 474 बांधकामांना नोटीस**

पान 2 पाहा

मराठी

# अक्रॉस मुंबई

संपादक- संजय मंगेश भैरे

**मंत्रिपद न मिळाल्यामुळे महायुतीतील नेते नाराज**

पान 3 पाहा

वर्ष: १० अंक : ३ ■मुंबई, मंगळवार १७ ते २३ डिसेंबर '२४ मूल्य - ५.०० रुपये पाने - ८

## हिवाळी अधिवेशनात २० विधेयके मांडण्यात येणार

## महाराष्ट्रात गतिशील कारभार सुरु - मुख्यमंत्री

■ नागपूर

राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आला असून यामध्ये एकूण 39 मंत्र्यांनी शपथ घेतलेली आहे. महाराष्ट्रात आजपासून गतिशील कारभार सुरू झाला आहे. हिवाळी अधिवेशनात विरोधी पक्षाने विविध संसदीय आयुधांचा वापर करून उपस्थित केलेल्या सर्व



प्रश्नांवर चर्चा करून राज्याच्या व जनतेच्या हितासाठी निर्णय घेण्यात येतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. हिवाळी अधिवेशनात एकूण 20 विधेयके मांडण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हिवाळी अधिवेशन आहे आणि थंडी देखील आहे. त्यामुळे या अधिवेशनामध्ये आम्ही महाराष्ट्राच्या जनतेला ऊब मिळेल आणि ऊर्जा मिळेल, अशा प्रकारचा कारभार करण्याचा प्रयत्न निश्चितपणे करू. महाराष्ट्रामध्ये सामान्य माणसाला आणि विशेषतः विदर्भात अधिवेशन चालू असल्यामुळे विदर्भाच्या जनतेला देखील दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. या अधिवेशनामध्ये राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा, पुरवणी मागण्यांवर चर्चा, सत्तारूढ पक्ष व विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर चर्चा असे कामकाज होणार असून त्यासोबत जवळपास वीस विधयेके मांडण्यात येणार आहेत.

महाराष्ट्रातल्या प्रत्येक व्यक्तीने महाराष्ट्राकरिता मतदान केले आहे, म्हणून आमचे सरकार हे 'ईव्हीएम' सरकार आहे, पण त्या ईव्हीएमचा अर्थ 'एव्हरी वोट फॉर मॅग्नेटिक महाराष्ट्र' असा आहे. आम्ही मॅग्नेटिक महाराष्ट्र घडविण्याकरिता या पुढच्या काळामध्ये निश्चितपणे कामकाज करणार आहोत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

सोयाबीनच्या खरेदीमध्ये यावर्षी आपण गेल्या पंधरा वर्षाचे रेकॉर्ड तोडले आहे. यंदाही मोठ्या प्रमाणात खरेदी सुरू आहे. मागच्या वर्षी सोयाबीन आणि कापसासाठी भावांतर योजना राबवून बाजारभाव व हमीभाव यातील फरकाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली. तसेच धानाच्या शेतकऱ्याला हेक्टरी 20 हजार रुपये दिले. हे शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ताकदीने उभे राहणारे शासन आहे, असेही त्यांनी सांगितले.

परभणीमधील घटना ही एका मनोरुग्णामुळे घडली असून मनोरुग्णाच्या कृत्यावर कोणतेही असंविधानिक उद्रेक करणे योग्य नाही. हे शासन संविधानाचा सर्वोच्च सन्मान करणारे आहे. संविधानाच्या बाहेर तसूभरही वेगळे काम करणार नाही. आमचे सरकार संविधानाचा गौरव करणारे आहे. बीड जिल्ह्यातील घटनेची विशेष एसआयटीमार्फत चौकशी करण्यात येणार असून आरोपी कोणीही असले तरी त्यांना सोडले जाणार नाही. अशा घटना महाराष्ट्रात गांभीर्यानेच घेतल्या जातात व यापुढेही घेतल्या जातील, असेही त्यांनी सांगितले.

# महायुतीच्या 39 मंत्र्यांची शपथ

## 25 नवे चेहरे 11 जणांना डच्चू



■ नागपूर

**राज्यातील महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार नागपूरमधील राजभवन येथे संपन्न झाला. महायुती सरकारमध्ये एकूण ३९ आमदारांनी आज मंत्रिपदाची शपथ घेतली. त्यामध्ये, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वप्रथम शपथ घेतली. नागपूर येथील राजभवनवर राज्यपाल राधाकृष्णन यांनी सर्वच मंत्र्यांना पद व गोपनियतेची शपथ दिली.** त्यामध्ये, ३३ कॅबिनेटमंत्री तर ६ राज्यमंत्र्यांचा शपथविधी सोहळा संपन्न झाला. राज्यातील महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात ४ लाडक्या बहिणींना संधी देण्यात आली आहे. पंकजा मुंडेसह आदिती तटकरे यांना दुसऱ्यांदा संधी मिळाली आहे. तर, मेघना बोर्डीकर आणि माधुरी मिसाळ हे दोन नवे चेहरे मंत्रिमंडळात आले आहेत. राज्यातील महायुती सरकारमधील ३९ मंत्र्यांचा शपथविधी आज नागपूर येथील राजभवनमध्ये संपन्न झाला. यामध्ये भाजपच्या सर्वाधिक १९ जणांचा समावेश आहे. तर शिवसेनेच्या ११, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या ९ जणांचा समावेश आहे. गेल्या मंत्रिमंडळातील काही जणांना डच्चू देत यंदा महायुतीमधील तिन्ही पक्षांनी मिळून २५ नवे चेहरे दिले आहेत. यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे व अजित पवार यांचा शपथविधी मुंबईत संपन्न झाला होता. दरम्यान, येत्या दोन दिवसांत सर्व मंत्र्यांना खातेवटप करण्यात येईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीनंतर संध्याकाळी झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

| कॅबिनेट मंत्री | |
|---|---|
| 1. | चंद्रशेखर बावनकुळे |
| 2. | राधाकृष्ण विखे पाटील |
| 3. | हसन मुश्रीफ |
| 4. | चंद्रकांत पाटील |
| 5. | गिरीश महाजन |
| 6. | गुलाबराव पाटील |
| 7. | गणेश नाईक |
| 8. | दादाजी भुसे |
| 9. | संजय राठोड |
| 10. | धनंजय मुंडे |
| 11. | मंगलप्रभात लोढा |
| 12. | उदय सामंत |
| 13. | जयकुमार रावल |
| 14. | पंकजा मुंडे |
| 15. | अतुल सावे |
| 16. | अशोक उईके |
| 17. | शंभूराज देसाई |
| 18. | आशिष शेलार |
| 19. | दत्तात्रय भरणे |
| 20. | अदिती तटकरे |
| 21. | शिवेंद्रराजे भोसले |
| 22. | माणिकराव कोकाटे |
| 23. | जयकुमार गोरे |
| 24. | नरहरी झिरवाळ |
| 25. | संजय सावकारे |
| 26. | संजय शिरसाट |
| 27. | प्रताप सरनाईक |
| 28. | भरत गोगावले |
| 29. | मकरंद पाटील |
| 30. | नितेश राणे |
| 31. | आकाश फुंडकर |
| 32. | बाबासाहेब पाटील |
| 33. | प्रकाश आबिटकर |

| राज्यमंत्री | |
|---|---|
| 34 | माधुरी मिसाळ |
| 35 | आशिष जयस्वाल |
| 36 | तुषार राठोड |
| 37 | मेघना बोर्डीकर |
| 38 | इंद्रनील नाईक |
| 39 | योगेश कदम |

राज्यमंत्री



मंत्रिमंडळ विस्तारात सर्व समाजाला प्रतिनिधित्व मिळण्यासाठी जातीय समतोल साधला गेला आहे. तसेच, सर्व विभागातील आमदारांनाही संधी मिळाली आहे. यात मराठवाड्यातील 6 आमदारांचा समावेश आहे. महायुतीच्या मंत्रिमंडळ विस्तारात मराठवाड्याच्या वाट्याला 6 मंत्रीपदे आली आहेत. यात तीन जुने चेहरे आहेत, तर तीन नवीन चेहऱ्यांचा समावेश आहे. जुन्या चेहऱ्यांमध्ये बीड जिल्ह्यातील मुंडे भाऊ-बहीण, म्हणजेच पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांचा समावेश आहे. दोघेही दुसऱ्यांदा कॅबिनेट मंत्री बनले आहेत. याशिवाय, औरंगाबाद(छत्रपती संभाजीनगर) पूर्वमधून हॅट्रिक करणारे भाजप नेते अतुल सावे यांचाही समावेश आहे. सावे सलग तिसऱ्यांदा मंत्री होणार आहेत. नवीन चेहऱ्यांमध्ये शिवसेना आमदार संजय शिरसाट, भाजप आमदार मेघना बोर्डीकर आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाबासाहेब पाटील यांचा समावेश आहे. संजय शिरसाट औरंगाबाद(छत्रपती संभाजीनगर) पश्चिममधून सलग चौथ्यांदा निवडून आले आहेत. तर, भाजप नेत्या मेघना बोर्डीकर सलग दुसऱ्यांदा परभणी जिल्ह्यातील जिंतूर मतदारसंघातून निवडून आल्या आहेत. याशिवाय, राष्ट्रवादी काँग्रेसचे बाबासाहेब पाटीलदेखील सलग दुसऱ्यांदा लातूर जिल्ह्यातील अहमदपूरमधून निवडून आले आहेत. अशारितीने मराठवाड्यातील सहा नेत्यांच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ पडली आहे.

**कोणकोणते नवे चेहरे?**

चंद्रशेखर बावनकुळे, गणेश नाईक, जयकुमार रावल, पंकजा मुंडे, अशोक उईके, आशिष शेलार, दत्तात्रय भरणे, शिवेंद्रराजे भोसले, माणिकराव कोकाटे, जयकुमार गोरे, नरहरी झिरवळ, संजय सावकारे, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, भरत गोगावले, मकरंद पाटील, नितेश राणे, आकाश फुंडकर, बाबासाहेब पाटील, प्रकाश आबिटकर, माधुरी मिसाळ, आशिष जैस्वाल, पंकज भोयर, मेघना बोर्डीकर, इंद्रनील नाईक.

**कोणाकोणाला डच्चू?**

सुधीर मुनगंटीवार, विजयकुमार गावित, रविंद्र चव्हाण, सुरेश खाडे, तानाजी सावंत, अब्दुल सत्तार, दीपक केसरकर, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, अनिल पाटील, संजय बनसोडे.

## भुजबळांना मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने आश्चर्य

■ नाशिक

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आज नागपुरात मंत्रिमंडळ विस्तार पार पडला. या शपथविधी सोहळयात फडणवीस सरकारमध्ये ३९ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. मात्र या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री छगन भुजबळ यांना संधी न देण्यात आल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या. नाशिक जिल्ह्याच्या राजकारणावर गेल्या अनेक वर्षांपासून छगन भुजबळ यांची पकड राहिली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, नाशकातील मोठे प्रकल्प, विकासकामे, साहित्य-सांस्कृतिक उपक्रम यात भुजबळ आघाडीवर राहिले आहेत. पहिल्या फळीचे नेते म्हणून त्यांचे मंत्रिपद निश्चित मानले जात होते. मात्र ऐनवेळी त्यांना डच्चू देण्यात आला. राज्याच्या राजकारणात आपलं वजन निर्माण करणाऱ्या छगन भुजबळ यांना पहिला धक्का बसला होता तो महाराष्ट्र सदन घोटाळयातील आरोपी आणि नंतर झालेल्या जेलवारीमुळे. ईडीकडून मनी लॉन्ड्रिंगप्रकरणी भुजबळ यांना अटक करण्यात आली होती. काही महिने तुरुंगात राहिल्यानंतर त्यांची जामीनावर सुटका झाली. त्यानंतर महाविकास आघाडी सरकारमध्ये आणि नंतर महायुती सरकारमध्येही ते मंत्री झाले. मात्र राज्यात मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात उभ्या राहिलेल्या मराठा आरक्षण आंदोलनावेळी भुजबळ यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. जरांगे आणि भुजबळ यांच्यात वारंवार शाब्दिक फैरीही झडल्या. यातून राज्यातील सामाजिक आणि राजकीय वातावरण ढवळून निघालं. भुजबळांच्या राजीमान्याचीही मागणी होत होती. मात्र अजित पवार हे त्यांच्या पाठीशी राहिले आणि भुजबळांचे मंत्रिपद कायम राहिले. परंतु आता नव्या सरकारमध्ये मात्र अजित पवारांनी छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश केलेला नाही. मराठा आरक्षणावेळी घेतलेली आक्रमक भूमिका, हेच भुजबळांच्या गच्छंतीचे कारण ठरले का, अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.



## देवाभाऊंचे गृहशहरात जल्लोषात स्वागत

■ नागपूर

नागपूरचे सुपुत्र असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विमानतळ ते लक्ष्मीभवन चौक या मार्गावरील विविध चौकांत ढोल ताशांच्या निनादात आणि पुष्पवृष्टी करत नागरिकांनी स्वागत केले. 'देवा भाऊ आगे बढो, भारतीय जनता पक्षाचा विजय असो', अशा घोषणांनी विमानतळ परिसर दुमदुमुन गेला होता. हॉटेल ब्ल्यू रेडिसनसमोर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत करत त्यांना शुभेच्छा दिल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रथम नगरागमनानिमित्त भाजपने त्यांच्या स्वागतासाठी शहरात जंगी तयारी केली होती. ठिकठिकाणी मोठे होर्डिंग लावण्यात आले होते. राज्याच्या सर्वोच्च पदाची तिसऱ्यांदा सूत्रे स्वीकारल्यानंतर रविवारी दुपारी १२ वाजता त्यांचे नागपूर विमानतळावर आगमन झाल्यावर भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी विमानतळ परिसरात कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. त्यांना लाडक्या बहिणीने औक्षण केले. देवा भाऊंचा विजय असो... अशा घोषणांनी परिसर दुमदुमन गेला. त्यांच्या स्वागतासाठी पक्षाचे कार्यकर्तेच नाही तर, मोठ्या प्रमाणात मिरवणुकीच्या मार्गावर लाडक्या बहिणी आणि सर्वसामान्य देखील उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे १२ वाजता आगमन झाल्यानंतर त्यांनी विमानतळ परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. त्यानंतर विमानतळ चौकातील हेडगेवार स्मारकस्थळी वंदन केले. त्यानंतर हॉटेल प्राइड येथून मिरवणुकीला प्रारंभ झाला. देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत पत्नी अमृता फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णा खोपडे आदी खुल्या जीपवर होते. यावेळी सोमलवाडा चौक, राजीव नगर चौक, रेडिसन ब्ल्यू हॉटेल चौक, छत्रपती चौक येथून डावीकडे खामला चौक येथून उजवीकडे तात्या टोपे चौक, आठ रस्ता चौक, लक्ष्मीनगर चौक, बजाजनगर चौक, शंकरनगर चौक मार्गाने लक्ष्मीभवन चौक याठिकाणी देवेंद्र फडणवीस यांचे पुष्पवृष्टी करत स्वागत करण्यात आले. लक्ष्मीभवन चौकात विविध लोकनृत्य आणि लेझीम पथकाने कवायती सादर करत त्यांचे स्वागत केले. लक्ष्मीभवन चौकात मिरवणुकीचा समारोप झाला.



*नागपूर येथील गणेशपेठ परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या विदर्भ व नागपूर विभागीय पक्ष कार्यालयाचा उद्घाटन समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या अत्याधुनिक आणि सुसज्ज कार्यालयातून जनसेवेची तसेच पक्षाच्या संघटन वृद्धीसाठीची सर्व महत्त्वपूर्ण कामे होतील, अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली. याप्रसंगी पक्षाचे ज्येष्ठ नेते, खासदार, नवनिर्वाचित आमदार, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

## विरोधी पक्षाचा चहापानावर बहिष्कार

## राज्यात कायदा आणि सुव्यवस्था ढासळल्याची टीका

■ नागपूर

परभणीत संविधान प्रतिकृतीची विटंबना झाल्यानंतर पोलिसांनी आंबेडकरी अनुयायांवर केलेला लाठीहल्ला, बीड जिल्ह्यातील सरपंच हत्येच्या गुन्ह्यातील आरोपी वाल्मिक कराडचे सत्ताधारी पक्षाचे आमदार धनंजय मुंडे यांच्याशी असलेले संबंध आणि मारकडवाडीतील नागरिकांचे आंदोलन दडपण्यासाठी दाखल करण्यात आलेले गुन्हे लक्षात घेता राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली असल्याची टीका करत विरोधी पक्षाने रविवारी हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चहापानावर बहिष्कार टाकला. हा निर्णय जाहीर करण्यासाठी आयोजित पत्रकार परिषद बोलताना आघडीच्या नेत्यांनी महायुती सरकारला विविध मुद्द्यांवरून लक्ष्य केले.

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला आज, सोमवारपासून येथे सुरुवात होत आहे. राज्य सरकारच्या वतीने रविवारी विरोधी पक्षाला चहापानाचे निमंत्रण देण्यात आले होते. मात्र, विदर्भातील अनुशेष, सोलापूर जिल्ह्यातील मारकडवाडीतील ग्रामस्थांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे, परभणीतील हिंसाचार, बीड जिल्ह्यात सरपंचाची झालेली हत्या, शासकीय रुग्णालयात झालेला बनावट औषधांचा पुरवठा, शेतकरी आत्महत्या, सरकारी सेवेतील रिक्त पदे, राज्यावर असलेला आठ लाख कोटी रुपयांच्या कर्जाचा



बोजा आदी मुद्दे उपस्थित करत विरोधी पक्षाने सरकारच्या वतीने आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या " रामगिरी 'या शासकीय निवासस्थानी आयोजित चहापानाच्या कार्यक्रमाला न जाण्याचा निर्णय घेतला. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या निर्णयाची माहिती दिली.

राज्यातील सरकार शेतकरी विरोधी, दलितांवर अत्याचार करणारे आणि दिवसाढवळ्या खून करणारे असल्याचा गंभीर आरोप करत दानवे म्हणाले, हे सरकार ईव्हीएमच्या आधारावर सत्तेत आले आहे. आज दूधाचे दर घसरल्याने शेतकऱ्यांची दयनीय अवस्था झाली आहे. परभणी येथे संविधानाची विटंबना झाल्यावर उमटलेल्या पडसादानंतर झालेल्या कोंबिग ऑपरेशन दरम्यान अटक केलेल्या सोमनाथ सोमवंशी या तरुणाचा कारागृहात मृत्यू झाला. अशा सर्व घटना घडत असताना मुख्यमंत्री हे मिरवणुकीत गुंतले आहेत, अशी टीका अंबादास दानवे यांनी केली.

### वैदर्भीय जनतेचा अपेक्षाभंग : वडेट्टीवार

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून विदर्भाचे मुख्यमंत्री झाल्यावर नागपूरात पहिले अधिवेशन होत असताना हिवाळी अधिवेशनाचा कालावधी कमी करून महायुती सरकारने वैदर्भीय जनतेचा अपेक्षाभंग केल्याची टीका काँग्रेसच्या विजय वडेट्टीवार यांनी यावेळी केली.

शाहू फुले आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात संविधानाची विटंबना झाली. यानंतर आंबेडकरी जनतेने आंदोलन केले. पण त्यातही कोम्बिंग ऑपरेशनच्या माध्यमातून कारवाई करण्यात आली. अनेक कार्यकर्त्यांना मारहाण झाली, धरपकड करण्यात आली. त्यातह एक कार्यकर्त्याचा मृत्यू झाला असून ही घटना संतापजनक आहे, असे वडेट्टीवार म्हणाले. बीडमध्ये एका सरपंचाचे अपहरण करून त्याची निर्घृण हत्या केली गेली. या गुन्ह्यातील आरोपीला राजकीय वरदहस्त असून खून करणाऱ्याला जे राजकीय आश्रय देत आहेत आज त्यांनाच मंत्री केले जात आहे, असा आरोपही वडेट्टीवार यांनी धनंजय मुंडे यांचे नाव न घेता केला.तर, राज्यात अजून सोयाबीन खरेदी केंद्र सुरू झाले नाही, याकडे लक्ष वेधत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शेतकरी कर्जमाफीबाबत सरकारने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी केली.

## संभलमध्ये चार मशिदी आणि एक मदरशातून 1.3 कोटी रुपयांची वीजचोरी

■ संभल

उत्तर प्रदेशमधील संभलमधील दोन भागांमध्ये वीज वितरणामधील अनियमितेचा तपास करण्यासाठी छापे टाकण्या आले होते. या कारवाईच्या दुसऱ्याच दिवशी (रविवार) गेल्या वर्षभरात या भागातील चार मशिदी आणि एका मदरशातून १.३ कोटी रुपयांची वीज चोरी करण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे. संभल प्रशासनाने जवळपास ५० वर्षांनंतर नुकतेच पुन्हा उघडलेल्या पुरातन मंदिराच्या जवळच या मशिदी आणि मदरसा आहे. जिल्हा प्रशासनाकडून वीजचोरीविरोधात चालवलेल्या मोहिमेदरम्यान हे मंदिर आढळून आल्याचे प्रशासनाकडून सांगितले जात आहे. तसेच संभलचे जिल्हा दंडाधिकारी राजेंद्र पेंसिया यांनी दावा केला की, शनिवारी पहाटे ५ वाजता लाऊडस्पीकर्सची तपासणी सुरू असताना त्यांना या भागात वीज चोरी केली जात असल्याचे त्यांच्या लक्षात आले. संभलच्या दीपा सराई आणि नाई सराई या भागातदेखील पोलीस, जिल्हा प्रशासन आणि उत्तर प्रदेश वीज महामंडळ कर्मचाऱ्यांच्या संयुक्त पथकाने दोन छापे टाकले होते.

## डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेच्या वतीने अजितदादांचा सत्कार





■ मुंबई

डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्रच्या वतीने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राज माने यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व श्री.विठ्ठल-रुक्मिणींची मूर्ती भेट देवून सत्कार करण्यात आला.संघटनेचे राजा माने,राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत, मुंबई अध्यक्ष संजय भैरे व राज्य कार्यकारिणी सदस्य दिपक नलावडे यांनी आज उपमुख्यमंत्री अजितदादा यांनी त्यांच्या देवगिरी या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. पत्रकार सन्मान योजना मानथन वाढ, डिजिटल मिडियाच्या विविध समस्या आणि पत्रकार अथिस्वीकृती तसेच पत्रकार पेन्शन योजना नियमावली संदर्भातील प्रश्नी लक्ष घातल्याबद्दल अजितदादांचे आभार मानले.

## परभणी दगडफेक प्रकरणातील तरुणाचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू

■ परभणी

परभणी येथील स्टेशन रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयासमोर असलेल्या संविधान प्रतिकृतीचा अवमान झाल्याचा प्रकार समोर आला होता. याच्या निषेधार्थ पुकारण्यात आलेल्या बंदला हिंसक वळण लागले. शहरातील काही दुकाने आणि वाहनांवर दगडफेकीच्या घटना घडल्या. संतप्त जमावाने एसटी बसवरही दगडफेक केली होती. दरम्यान आता या दगडफेक प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या एका तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी याबद्दल सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट केली आहे.

मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव सोमनाथ सुर्यवंशी असून प्रकाश आंबेडकरांनी त्याच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त केला आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले आहेत की, “परभणीत वडार समाजातील भीमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांचा कोठडीत मृत्यू झाला आहे, हे अत्यंत वेदनादायक, भयानक आणि असह्य करणारे आहे. त्यांचा जामीन अर्ज मंजूर होऊनही न्यायालयीन कोठडीतच त्यांचा मृत्यू झाला, याहून असहनीय काय असेल!” पुढे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले की, “त्यांचा (सोमनाथ सुर्यवंशी) मृत्यू न्यायालयीन कोठडीत झाला असल्याने, आमचे वकील न्यायालयाला विनंती करतील की पोस्टमॉर्टम (सीटी स्कॅन, एमआरआय, फॉरेन्सिक आणि पॅथॉलॉजिकल) फॉरेन्सिक विभाग असलेल्या सरकारी रुग्णालयामध्ये केले जावे आणि फॉरेन्सिक आणि पॅथॉलॉजी या दोन्ही विभागांकडून पोस्टमॉर्टमचे चित्रीकरण केले जावे”. याबरोबरच प्रकाश आंबेडकर यांनी “आम्ही न्यायासाठी लढू!”, असेही म्हटले आहे.

वंचित बहुजन आघाडीने सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर काल एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या पोस्टमधून परभणी पोलीसांनी दलित महिलेला मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मराठी अक्रॉस मुंबई

## उत्तर मुंबईत पत्रकार भवन उभारण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य : आमदार संजय उपाध्याय यांची ग्वाही

■ मुंबई

उत्तर मुंबईत पत्रकार भवन उभारण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करीन आणि गुरुजींनी सांगितल्याप्रमाणे या भव्य पत्रकार भवनाचे भूमिपूजन आणि उद्घाटन आपणच करु, अशी नि:संदिग्ध ग्वाही बोरीवलीचे आमदार संजय उपाध्याय यांनी दिली. महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या आणि बोरीवली मतदारसंघातून विक्रमी मताधिक्याने संजय उपाध्याय हे निवडून आले. संजय उपाध्याय यांची भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यालयात राज्य अधिस्वीकृती समितीच्या सदस्या आणि बोरीवली येथील पत्रकार नेहा पुरव यांनी भेट घेतली त्यावेळी बोरीवली येथे आमदारांनी पत्रकारांशी संवाद साधावा अशी सूचना केली होती. त्याप्रमाणे मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे कोषाध्यक्ष आणि दैनिक भास्करचे विशेष राजकीय प्रतिनिधी विनोदकुमार यादव यांना आमदार संजय उपाध्याय आणि पत्रकार यांच्या मध्ये समन्वय साधण्याची जबाबदारी देण्यात आली. बोरीवली पश्चिम येथील एका हॉटेलमध्ये पत्रकारांसमवेत संवादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी उत्तर मुंबई पत्रकार संघाचे सरचिटणीस आणि ज्येष्ठ राजकीय विश्लेषक श्री योगेश वसंत त्रिवेदी यांनी परखडपणे भूमिका मांडतांना सांगितले



की, लोकप्रतिनिधींनी दिलेल्या वेळेत येण्याची गरज आहे. पत्रकारांना गृहीत धरण्यात येऊ नये. ज्येष्ठ राजकीय विश्लेषक सामाजिक कार्यकर्ते श्री. विजय वैद्य यांच्या नेतृत्वाखाली २०११ साली दहिसर, बोरीवली, कांदिवली, चारकोप, मालाड आणि मागाठाणे या सहा विधानसभा मतदारसंघ म्हणजे उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघ या क्षेत्रातील सर्व भाषिक पत्रकारांसाठी उत्तर मुंबई पत्रकार संघ स्थापन करण्यात आला. हा संघ नोंदणीकृत सुद्धा आहे. सुमारे दीडशे दोनशे पत्रकार या क्षेत्रात कार्यरत आहेत. या पत्रकारांसाठी एक पत्रकार भवन उभारण्यात यावे. ही भव्य वास्तू सभागृह, समिती कक्ष, उपहारगृह, कानाकोपऱ्यातून येणाऱ्या पत्रकारांसाठी वास्तव्य करण्याची व्यवस्था, बँक आदी सुविधांनी सुसज्ज असावी, अशी आमची मागणी आहे. डॉ. मनोहर जोशी हे मुख्यमंत्री आणि गोपीनाथ मुंडे हे उपमुख्यमंत्री असतांना राज्य सरकारने सर्व जिल्ह्यात पत्रकार भवन उभारण्यात येणार असल्याचा निर्णय घेतला होता.

मुंबई शहर जिल्ह्यात मुंबई महानगरपालिका मुख्यालयासमोर भव्य पत्रकार भवन आहे. मात्र मुंबई उपनगरात असे भवन नाही. उत्तर मुंबई पत्रकार संघाने तत्कालीन खासदार गोपाळ शेट्टी यांना या मागणीचे निवेदन दिले. त्यांनी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे पत्र लिहून आमची मागणी पुढे रेटली. जागाही आहे. आता आपण पाठपुरावा करा. आपणच भूमिपूजन करा आणि उद्घाटन आपणच करा. याचा उपयोग लोकप्रतिनिधींनाच जास्त होऊ शकतो. आमदार संजय उपाध्याय यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला आणि उत्तर मुंबईत पत्रकार भवन उभारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीन म्हणजे हॉटेल घेण्याचीही गरज भासणार नाही. त्या पत्रकार भवनातच आपण भेटून संवाद साधू शकतो, असे स्पष्ट केले. उपस्थित सर्व पत्रकारांनी या भूमिकेचे स्वागत केले. आमदार संजय उपाध्याय यांच्या धर्मपत्नी सौ. नीलम संजय उपाध्याय, प्रदेश प्रवक्ते अवधूत वाघ, निरंजन शेट्टी, उत्तर मुंबई पत्रकार संघाचे सरचिटणीस प्रवीण वराडकर, कुनेश दवे, दीपक भातुसे, मनोहर कुंभेजकर, मयुर परीख, अभय मिश्रा, राजकुमार सिंह, दत्ताराम घुगे, नीलाबेन सोनी, श्याम कदम आदी मान्यवर यावेळी आवर्जून उपस्थित होते.

## मुंबई मराठी पत्रकार संघाच्या ठसा छायाचित्र स्पर्धेचा निकाल जाहीर





■ मुंबई

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या आगामी २०२५ सालच्या दिनदर्शिकेसाठी छायाचित्र स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत 12 महिन्यासाठी १२ छायाचित्रांची निवड करण्यात आली. त्यासाठी तीन सदस्यीय समिती नेमण्यात आली होती. एकूण २८० फोटोतून ही १२ छायाचित्रे निवडण्यात आली. त्यापैकी कुणाल पाटील आणि संतोष नागवेकर यांची प्रत्येकी २ छायाचित्रे निवडण्यात आली.

या स्पर्धेसाठी सिने डायरेक्टर महेश लिमये, ज्येष्ठ छायाचित्रकार विकास खोत आणि क्युरेटर अलीफ़िया वाहनवटी यांची निवड समिती नेमण्यात आली होती. या स्पर्धेचे प्रुमख संयोजक म्हणून अंशुमन पोयरेकर यांनी काम पाहिले.

स्पर्धेतील सहभागी २८० फोटोतून ही अंतिम १२ छायाचित्रे मराठी पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेसाठी निवडण्यात आली. निवडप्रक्रिया पारदर्शक राहावी म्हणून तीनही सदस्यांना छायाचित्रकारांचे फोटो कोणत्याही माहितीशिवाय देण्यात आले होते. त्यातून हे १२ फोटो 12 महिन्यांच्या संकल्पनेवर निवडण्यात आले. या फोटोंचा समावेश असलेली दिनदर्शिका मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सदस्यांना विनामूल्य देण्यात येणार आहे, अशी माहिती मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी दिली.

**या छायाचित्र स्पर्धेत विजेते ठरलेले छायाचित्रकार पुढीलप्रमाणे :** आशीष राणे, संतोष नागवेकर, सतेज शिंदे, एम्यान्यूअल कारभारी, अतुल कांबळे, राजू शिंदे, संदीप पागडे, सत्यजित देसाई, प्रशांत अंकुशराव, कुणाल पाटील

## अमित शहा व नड्डा यांच्या उपस्थितीत भाजपाचे 12 जानेवारीला शिर्डीत प्रदेश अधिवेशन

■ मुंबई

येत्या १२ जानेवारीला केंद्रिय गृहमंत्री अमित शहा व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा यांच्या प्रमूख उपस्थितीत प्रदेश भाजपचे अधिवेशन अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी येथे होणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी प्रदेश कार्यालयात पार पडलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

१२ जानेवारीला स्वामी विवेकानंद यांची जयंतीचे औचित्य साधून प्रदेश भाजपाने एक मोठा उपक्रम हाती घेतला आहे.स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर आधारित हे अधिवेशन असेल. तसेच स्वामी विवेकानंद यांच्या विचारांनुसार युवकांना प्रेरित करून भाजपाकडे आकर्षित करण्यासाठी या वेळी नवीन अभियानाची सुरुवात होणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.त्याचवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाही याच अधिवेशनात भव्य सत्कारही केला जाणार आहे, असेही बावनकुळे यांनी यावेळी आवर्जून नमूद केले.

**१० हजार कार्यकर्ते उपस्थित राहणार**

शिर्डी येथील अधिवेशनासाठी राज्यभरातून सुमारे १० हजार भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित राहणार असल्याचेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.तरुणाईशी संपर्क वाढविण्यासाठी विशेष अभियान राबविण्यात येणार असल्याने हे अधिवेशन भाजपाच्या आगामी काळातील योजनांसाठी महत्त्वाचे असेल, असा ठाम विश्वासही बावनकुळे यांनी व्यक्त केला.

## पराभवानंतर आता काँग्रेसमध्ये झाडाझडती

### रमेश चेन्नीथल्ला जाणून घेणार आमदारांची मते

■ मुंबई

विधानसभा निवडणुकांत काँग्रेसला महाराष्ट्रात विदारक पराभवाला सामोरे जावे लागले. आता याचे पडसाद पक्षात उमटत आहेत. पक्षाचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथल्ला आता या पराभवाची कारणमीमांसा करणार असून पदाधिका-यांची झाडाझडती घेणार आहेत. येत्या १७ तारखेला नागपूर येथे पक्षाचे नवनिर्वाचित आमदार तसेच पराभूत उमेदवार यांच्याशी चर्चा करून त्यांची मते जाणून घेणार आहेत.

विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने महाविकास आघाडी अंतर्गत १०१ जागा लढविल्या होत्या. पण त्यापैकी केवळ १६ जागांवरच त्यांना यश मिळविता आले. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्यासारख्यांना देखील पराभव पत्करावा लागला. आता या विदारक पराभवाचे पडसाद पक्षात उमटायला सुरूवात झाली आहे. विधिमंडळ अधिवेशना तोंडावर आले तरी अदयाप काँग्रेसला विधिमंडळ गटनेता निवडता आलेला नाही. सोमवारपासून नागपूर येथील हिवाळी अधिवेशन सुरू होत आहे. या पार्श्वभूमीवर आता झाडाझडती सुरू होणार आहे. महाराष्ट्र काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथल्ला १७ तारखेला काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित आमदार, विधान परिषद सदस्य व २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतील पक्षाचे सर्व उमेदवार यांच्याशी नागपूरमध्ये चर्चा करणार आहेत. नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात ही चर्चा होणार असून सकाळी ११ वाजता आमदारांशी तर दुपारी १ वाजता विधानसभा निवडणुकीतील उमेदवारांशी स्वतंत्रपणे चर्चा करणार आहेत. नागपूर येथे होत असलेल्या या महत्वपूर्ण चर्चेला संबंधित सर्वांनी उपस्थित रहावे असे निर्देश काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिले आहेत.

## नवीन वर्षांत कोकण-गोव्यात जायला 64 स्पेशल ट्रेन

■ मुंबई

नाताळ आणि नवीन वर्षांत तुम्ही कुठे बाहेर फिरायला जाण्याचा प्लान आखत असाल तर तुमच्यासाठी ही महत्त्वाची बातमी आहे. नाताळ व नव वर्षापर्यंत सुट्ट्यांचा काळ असतो. या सुट्ट्यांमध्ये अनेक जण फिरायला जाण्याचा प्लान करतात. पण अशावेळी ट्रेनचे तिकीट कन्फर्म मिळेलच की नाही, याची शक्यता नसते. ट्रेनमध्ये कन्फर्म तिकीट मिळवण्यासाठी खूप जुगाड करावे लागतात. या सुट्ट्यांमध्ये फेरायला जाण्यासाठी रेल्वेने एक महत्त्वाची घोषणा केली आहे. सेंट्रल आणि वेस्टर्न रेल्वेने प्रवाशांसाठी ६४ स्पेशल ट्रेनची घोषणा केली आहे. की ट्रेन दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, खेड, चिपळुण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, कणकवली, कुडाळ, थिविम येथे थांबा आहे. एक वातानुकूलित प्रथम श्रेणी, एक वातानुकूलित प्रथम श्रेणीसह वातानुकूलित-२ टायर, तीन वातानुकूलित-२ टायर, ११ वातानुकूलित-३ टायर, २ स्लीपर श्रेणी, २ सामान्य द्वितीय श्रेणी अशी रचना असणार आहे.

नाताळ स्पेशल ट्रेनची संपूर्ण लिस्ट

१) सीएसएमटी ते करमाळा सीएसएमटी दैनिक विशेषः ३४ फेऱ्या

०११५१ विशेष दिनांक २० डिसेंबर २०२४ ते ५ जानेवारी २०२५ पर्यंत दररोज मध्यरात्री १२.२० वाजता मुंबई सीएसएमटीवरुन निघणार आहे तर त्याच दिवशी १३.३० वाजता करमाळाला पोहोचणार आहे. (१७



फेऱ्या)

२) एलटीटी-कोचुवेली- एलटीटी साप्ताहिक सेवा-८ फेऱ्या

०१४६३ स्पेशल लोकमान्य टिळक टर्मिनस येथून १९ डिसेंबर २०२४ ते ९ जानेवारी २०२५ पर्यंत दर गुरुवारी १६.०० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी २२.४५ वाजता कोचुवेली येथे पोहोचेल. (४फेऱ्या)

०१४६४ स्पेशल कोचुवेली येथून २१ डिसेंबर २०२४ ते ११ जानेवारी २०२५ पर्यंत दर शनिवारी १६.२० वाजता सुटेल आणि तिसऱ्या दिवशी लोकमान्य टिळक टर्मिनस येथे ००.४५ वाजता पोहोचेल. (४ फेऱ्या) ही ट्रेन ठाणे, पनवेल, पेण, रोहा, खेड, चिपळुण, संगमेश्वर रोड, रत्निगिरी, कणकवली, कुडाळ, थिविम, करमाली, मडगाव जंक्शन, कारवार, गोकर्ण रोड, कुमटा, मुर्डेश्वर, भटकल, मुकांबिका रोड, बेंदूर, कुंदापुरा, उडुपी, सूरतकल, थोकूर, मंगलुरु जंक्शन, कासारगोड, कन्नूर, कालिकत, तिरूर, शोरानूर, त्रिशूर, एर्नाकुलम टाउन, कोट्टायम, तिरुवल्ला, चेंगन्नूर, मावेलिक्कारा, कायमकुलम आणि कोल्लम येथे थांबेल..

३) पुणे-करमाळी-पुणे साप्ताहिक विशेष (६ फेऱ्या)

०१४०७ विशेष गाडी २५ डिसेंबर २०२४ ते ०८ जानेवारी २०२५ पर्यंत दर बुधवारी पुण्याहून ०५.१० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी २०.२५ वाजता करमाळी येथे पोहोचेल. (३ फेऱ्या)

०१४०८ विशेष गाडी २५ डिसेंबर २०२४ ते ०८ जानेवारी २०२५ पर्यंत दर बुधवारी करमाळी येथून २२.२० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी १३.०० वाजता पुण्याला पोहोचेल.

(३ फेऱ्या) ही ट्रेन चिंचवड, तळेगाव, लोणावळा, कल्याण, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड आणि थिविम येथे थांबेल.

४) ट्रेन क्रमांक ०९४१२/०९४११ अहमदाबाद-थिविम स्पेशल (द्वि-साप्ताहिक) (१६ फेऱ्या)

ट्रेन क्रमांक ०९४१२ अहमदाबाद - थिविम स्पेशल अहमदाबादहून दर रविवारी आणि बुधवारी १४.१० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ११.०० वाजता थिविमला पोहोचेल. ही ट्रेन ०८ डिसेंबर २०२४ ते १ जानेवारी २०२५ पर्यंत धावणार आहे.

ट्रेन क्रमांक ०९४११ थिविम-अहमदाबाद स्पेशल थिविम येथून दर सोमवार आणि गुरुवारी ११.४० वाजता सुटेल आणि अहमदाबादला दुसऱ्या दिवशी ०८.४५ वाजता पोहोचेल. ही ट्रेन ९ डिसेंबर २०२४ ते २ जानेवारी २०२५ पर्यंत धावणार आहे. ही गाडी दोन्ही दिशांना आनंद, वडोदरा, भरूच, उधना, वलसाड, वापी, पालघर, वसई रोड, पनवेल, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, राजापूर रोड, कणकवली, कुडाळ आणि सावंतवाडी रोड स्थानकांवर थांबेल.

या ट्रेनमध्ये एसी २-टायर, एसी ३-टायर, स्लीपर क्लास आणि सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे असतील.

## केईएममध्ये एक्सरे टेक्निशियनला प्रथम वर्षाच्या डॉक्टरांकडून मारहाण

■ मुंबई

केईएम रुग्णालयातील एक्स रे विभागातील टेक्निशियनला प्रथम वर्षाच्या डॉक्टराने मारहाण केल्याप्रकरणी कर्मचाऱ्यांकडून शुक्रवारी दुपारी आंदोलन करण्यात आले. संबंधित डॉक्टरला तीन दिवस निलंबित करण्यात आले असून भविष्यात डॉक्टरांकडून असे प्रकार घडणार नसल्याचे आश्वासन प्रशासनाकडून उपअधिष्ठाता डॉ. हरिष पाठक यांनी कर्मचाऱ्यांना दिले. केईएम रुग्णालयात दुपारी तीनच्या दरम्यान ऑर्थोपेडिक्स विभागातील प्रथम वर्षाचे डॉ निखिल बाडेकर एका रुग्णाला एक्स रे काढण्यासाठी तिसऱ्या मजल्यावर घेऊन आले होते. त्यावेळी एक्स रे विभागात ऑनड्यूटी असलेला टेक्निशियन दीपक जाधव याने रूग्णाच्या केसपेपर असलेल्या नोंदी अपूर्ण असून त्या पूर्ण करा, असे डॉ वाडेकर यांना सांगितले. याचा राग आल्याने डॉ. वाडेकर यांनी जाधव यांना धक्काबुक्की केली आणि एक चापट मारली. जाधव हे अपंग असल्याने त्यांना मारहाण करू नका, असे इतर कर्मचारी आणि प्रत्यक्षदर्शी सांगत होते पण वाडेकर यांनी मारहाण केल्याचे सांगितले. डॉ. निखिल वाडेकर यांच्यावरील आरोपांचे गांभीर्य लक्षात घेऊन आणि प्रकरणाची सविस्तर चौकशी प्रलंबित असताना बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा व शिस्त अधिनियम आणि नियमांनुसार प्राथमिक शिस्तभंगाची कारवाई म्हणून तत्काळ प्रभावाने तीन दिवसांसाठी त्यांना निलंबित करण्यात आले आहे. या निलंबनाच्या कालावधीत, हॉस्पिटलच्या आवारात जाण्यापासून, क्लिनिकल ड्युटींना उपस्थित राहण्यापासून, किंवा हॉस्पिटलचे कर्मचारी किंवा रुग्णांशी संवाद साधण्यापासून परावृत्त करण्यात आल्याचे पत्र उपअधिष्ठाता डॉ. हरिष पाठक यांनी दिले.

## संक्षिप्त

### वंचित बहुजन आघाडीचे ईव्हीएमविरोधात आंदोलन

■ मुंबई

वंचित बहुजन आघाडी भांडुप विधानसभा उमेदवार स्नेहाल सोहनी यांच्या नेतृत्त्वाखाली गुरुवारी भांडुप रेल्वे स्थानक पश्चिम येथे ईव्हीएमविरोधात अनोखे आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी ईव्हीएम मशीनच्या प्रतिकृतीची गावभर धिंड काढत केंद्रीय निवडणूक आयोगाचा निषेध नोंदविला. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक नसून भांडुप विधानसभेसह अनेक ठिकाणी मोठा घोटाळा झाल्याचा आरोप स्नेहल सोहनी यांनी केला. निवडणुका पारदर्शक पार पाहण्यासाठी बॅलेट पेपरचा निवडणुका घ्याव्या, अशी भूमिका संचित बहुजन आघाडीची आहे. सदर मोहिमेत भांडुपमधील अनेक सर्वसामान्य नागरिकांनी ही आपला सहभाग नोंदवला होता. यावेळी अंचित बहुजन महिला आघाडी मुंबई सदस्य अरुणा सावंत, कोषाध्यक्ष शिवराम वाघमारे व अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

### मेट्रो मार्गिकांच्या एकात्मिकरणाचा विचार; सल्लागार नेमण्यासाठी काढली निविदा

■ मुंबई

मुंबई महानगर प्रदेशात सध्या मेट्रो मार्गिकांचे जाळे उभे राहत आहे. या मार्गिकांच्या एकात्मिकरणासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे (एमएमआरडीए) सल्लागार संस्थेची नेमणूक केली जाणार आहे. यासाठी निनिवाड़ी कारण्यात आली आहे. सध्या मुंबईत बहिर ते अंभोरी परियम मेट्रो २ अ, दहिसर ते गुंदवली मेट्रो ७, गोंया ते पाटकोपर मेट्रो १ आणि आहे ते बीकेसी मेट्रो ३ या मार्गिका सुरू आहेत. मेट्रो ज्या लवकरच कुल्लाण्यापर्यंत विस्तार केला जाणार आहे. संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशात मिळून १४ मेट्रो मार्गिका भविष्यात असणार आहेत. या सर्व मार्गिकांचे एकात्मिकाण करून त्या प्रवाशांसाठी कशा सुलभ करता येतील याचा विचार सुरू आहे. एकामिवरणाचावत सल्ला देण्यासाठी एमएमआरडीए एका संस्थेची नेमणूक करणार असून त्यासाठी निविदा कारण्यात आली आहे.

### लोअर परळ रेल्वे वर्कशॉपमध्ये डब्याला आग; सुदैवाने जीवितहानी टळली

■ मुंबई

पश्चिम रेल्वेच्या लोअर परळ वर्कशॉपमध्ये गुरुवारी संध्याकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास एका रेल्वे इब्याला अचानक आग लागली. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाने घटनास्थली तत्काळ धाव घेतली आणि आगीवर युद्धपातळीवर नियंत्रण मिळवले. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. तसेच, हा वर्कशॉप डिपो मेंटेनन्ससाठी वापरला जात असल्याने रेल्वे मार्गावरही या घटनेचा कोणताही परिणाम झाला नाही. आग नेमकी कशामुळे लागली याची चौकशी सुरू असून, वर्कशॉपमधील सुरक्षा उपायांबाबतही पुनर्विचार होण्याची शक्यता आहे. रेल्वे प्रशासनाकडून घटनेच्या सविस्तर चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

### पूर्व द्रुतगती मार्गावर ट्रकवरुन कोसळली क्रेन

■ मुंबई

ट्रकमधून क्रेन घेऊन जातअसताना लोखंडी साखळी तुटल्याने पूर्व द्रुतगती मार्गावर शनिवारी सकाळी क्रेन कोसळली. या अपघातात एक दुचाकी चालक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर शीव रुग्णालयात उपचार सुरू आहेत. खड्डा खोदणारी मोठी क्रेन घेऊन अलिबाग येथून एक ट्रक निघाला होता. शनिवारी पहाटे पाचच्या सुमारास भांडुप येथे पूर्व द्रुतगती मार्गावरील घाटकोपर उड्डाणपूल उतरत असताना अचानक या क्रेनला बांधण्यात आलेली लोखंडी साखळी तुटली. त्यानंतर क्रेन ट्रकवरून खाली रस्तावर कोसळली.

पहाटेच्या वेळी वाहनांची वर्दळ जास्त नव्हती. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली आहे. मात्र या अपघात विपुल पांचाळ (वय ४४) हा दुचाकी चालक गंभीर जखमी झाला आहे. दुचाकी चालकाच्या पायावर क्रेनचा काही भाग कोसळल्याने त्याचा पाय पूर्णपणे निकामी झाला.

### वारकरी प्रबोधन महासमितीचा रौप्य महोत्सव

■ मुंबई

विठ्ठल नामाच्या जयघोषाने रविवार, ५ जानेवारी २०२५ रोजी अवघी मुंबापुरी दुमदुमणार आहे. वारकरी प्रबोधन महासमितीच्या रौप्य महोत्सवी सोहळ्यानिमित्त श्री पांडुरंगाचा भव्य पालखी सोहळा आणि संत संमेलन आयोजित केले आहे. वारकरी प्रबोधन महासमितीतर्फे दरवर्षी विठ्ठल नामाचा जयघोष करत भव्य पालखी सोहळा आयोजित केला जातो. यंदाचे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्त समितीने यंदा भव्य स्वरुपात संत संमेलन व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्याचे ठरविले आहे. रविवार, ५ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता मुंबईतील हजारो वारकरी व दिंड्यांच्या सहभागाने कॉटन ग्रीन येथील श्रीराम मंदिर येथून पालखी प्रस्थान होईल आणि दुपारी २ वाजता वडाळा विठ्ठल मंदिर येथे सांगता होईल. त्यानंतर फाइव गार्डन येथे माऊलींच्या अश्वाचा नयनरम्य रिंगण सोहळा संपन्न होणार आहे.

### तळोजात कुंटणखाना चालविणाऱ्या लॉजमालकाला अटक

■ मुंबई

पनवेल-मुंब्रा महामार्गावरील धानसर गावालगत रोमी लॉजवर तीन दिवसांपूर्वी पोलीसांनी धाड घालून कुंटणखान्यातून पाच महिलांची सुटका केली. पोलीसांनी या प्रकरणी रोमी लॉजचा मालक, व्यवस्थापक आणि वेटरवर अटकेची कारवाई केली असल्याची माहिती नवी मुंबई पोलीस गुन्हे अन्वेषण विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांनी दिली. पोलिसांच्या या धाडसत्रामुळे कुंटणखाना चालणाऱ्या लॉज मालकांचे धाबे दणाणले आहेत. नवी मुंबई पोलीस दलाच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक पृथ्वीराज घोरपडे यांना पनवेल-मुंब्रा महामार्गावरील धानसर गावालगतच्या रोमी लॉजिंग अॅण्ड बोर्डिंगवर लॉजमालक कुंटणखाना चालवत असल्याची माहिती मिळाली. ११ डिसेंबरला रात्री सापळा रचून बनावट गिऱ्हाईकाच्या साह्याने लॉजमध्ये चाललेल्या प्रकाराची खात्री केली. त्यावेळी लॉजवर पाच पीडित महिला सापडल्या.

## प्रवाशांची सुरक्षितता हेच एसटीचे अंतिम ध्येय- भरत गोगावले यांची ग्वाही

■ मुंबई

मुंबईत कुर्ला येथे जी भीषण बस दुर्घटना घडली एस टी महामंडळाचे अध्यक्ष व शिवसेना नेते आ.भरत गोगावले यांनी बुधवारी तातडीने सर्व प्रशासकीय प्रमुख,व अन्य अधिकाऱ्यांची खास बैठक बोलावून अशा घटना एसटी मध्ये घडू नयेत या दृष्टीने त्यांनी सर्व प्रमुखांना आवश्यक त्या उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या सक्त सूचना दिल्या. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी प्रवाशांची सुरक्षितता हेच एसटीचे अंतिम ध्येय राहील अशी स्पष्ट ग्वाहीही दिली.

गोगावले म्हणाले की,दररोज ५५ लाख प्रवाशांना सुरक्षित सेवा देण्याच्या उददेशाने एसटी महामंडळ गेली ७६ वर्ष काम करीत असून रस्त्यावरील अपघात कमी करण्यासाठी चालकांचे सुयोग्य प्रशिक्षण, त्यांचे मानसिक आरोग्य सुदढ करणे या बरोबरच तांत्रिकदृष्ट्या निर्दोष बसेंस उपलब्ध करुन देणे या त्रिसुत्रीवर यापुढे भर देण्यात येणार आहे.

प्रवाशांना सुरक्षित प्रवास उपलब्ध करुन देण्याच्या उददेशाने चालक प्रशिक्षण,चालकांची निवड



चाचणी, चालकाचे मानसिक आरोग्य याबरोबरच तांत्रिकदृष्ट्या निर्दोष वाहन उपलब्ध करुन देण्याबद्दलही आजच्या बैठकीत सखोल चर्चा करण्यात आली. सध्या एसटी महामंडळाच्या चालकांना अपघात होऊ नये यासाठी दर ६ महिन्याला उजळणी प्रशिक्षण दिले जाते.या प्रशिक्षणामध्ये चालकांच्या मानसि क आरोग्या बरोबरच त्यांचे बस चालवण्याचे कौशल्य विकसित करण्यावर भर दिला जातो. त्यानंतर प्रत्यक्ष वाहन चालन चाचणी घेऊन त्यांना पुनश्च सेवेमध्ये दाखल केले जाते. तसेच कर्तव्यावर असताना संबंधित चालकाने नशापान न करणे याचे काटेकोर पालन केले पाहिजे.हित पध्दत एसटीकडे कार्यरत असलेल्या खाजगी चालकांना देखील वापरण्याच्या सुचना एसटी प्रशासनाला देण्यात आल्याचे गोगवले यांनी स्पष्ट केले.

**वेळेत बसेसचा पुरवठा न करण्या-या संस्थाना कारणे दाखवा नोटिसी पाठवा...**

सध्या एसटी महामंडळाकडे १४००० बसेस असून,उपलब्ध प्रवाशांसासाठी त्या अत्यंत अपुऱ्या पडत आहेत. त्यापैकी अनेक बसेस अंत्यत जुन्या झाल्या आहेत.तसेच काही बसेस कालबाहय होण्याच्या उंबरठयावर आहेत.हि वसुस्थिती लक्षात घेता निविदा पात्र संस्थानी नवीन बसेस वेळेत पुरवठा करणे अत्यंत आवश्यक होते. मात्र त्या संस्था बसेस पुरविण्या बद्दल सक्षम का नाहीत? याची शहानिशा करुन त्यांना कारणे दाखवा नोटिस पाठवुन द्या असेही सक्त निर्देश एसटी प्रशासनाला दिल्याची माहितीही गोगावले यांनी दिली.

**भाडेवाढीचा प्रस्ताव लवकरच शासनाला सादर करणार...**

कर्मचा-यांचे वाढते वेतन, इंधनाचा वाढता दर, टायर आणि सुटटया भागांची वाढती किंमत विचारात घेऊन २०२१ पासुन प्रलंबित असलेली एसटीची तिकीट भाडेवाढ करण्याचा प्रस्ताव लवकरच शासनाला सादर केला जाईल अशीही माहिती अध्यक्ष गोगावले यांनी दिली. या वेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर व एसटीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## सांताक्रुझमधील निकृष्ट रस्त्याची चौकशी करा

### आ. आशिष शेलार यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

■ मुंबई

रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी मुंबई महापालिकेने सर्व रस्ते काँक्रीटचे करण्याची मोहीम हाती घेतली असली तरी आता या काँक्रिटीकरणाच्या दर्जाविषयी प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. सांताक्रूझ येथील काँक्रिटीकरण केलेल्या एका रस्त्याचे काम निकृष्ट असल्याची तक्रार सत्ताधारी पक्षाचे आमदार आणि भाजप मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांनी केली आहे. या कामाची चौकशी करण्याबरोबरच कामाच्या गुणवत्तेचे ऑडिट करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

वांद्रे पश्चिम विधानसभा मतदारसंघातील सांताक्रुझ पश्चिम येथे सुरू असलेल्या भार्गव रोड या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या कामाची पाहणी बुधवारी त्यांनी केली. यावेळी महापालिका सहायक आयुक्त विनायक विसपुते, संबंधित अधिकारी तसेच माजी नगरसेविका हेतल गाला आदी उपस्थित होते.

भार्गव रोड येथे नुकत्याच काँक्रिटीकरण केलेल्या रस्त्याला तडा गेल्याचे निदर्शनास आले. ही बाब अत्यंत गंभीर असून, अशा प्रकारे काम पूर्ण होण्याआधीच रस्त्याला भेगा पडत असतील, तर कामाच्या गुणवत्तेचे ऑडिट होणे आवश्यक आहे. या कामाची तातडीने चौकशी करा, असे निर्देश त्यांनी महापालिका अधिकाऱ्यांना दिले. दरम्यान, महापालिका आता काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## प्रदूषणः बुलेट ट्रेन, मेट्रोसह 474 बांधकामांना नोटीस

■ मुंबई

मुंबईतील हवेची गुणवत्ता खालावल्याने प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन करणारे पालिका प्रशासनाच्या रडारवर आले आहेत. प्रदूषण नियंत्रणाचे नियम मोडणाऱ्या बुलेट ट्रेन, मेट्रोसह ४७४ बांधकामांना पालिकेने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तसेच पुढील आठवडाभरात पालिकेकडून पुन्हा झाडाझडती घेण्यात येणार असून पूर्तता करण्यासाठी तीन दिवसांची अंतिम नोटीस बजावण्यात येणार आहे. तीन दिवसांच्या कालावधीत संबंधितांनी प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजना केल्या नाहीत, तर थेट स्टॉप वर्कची कारवाई करण्यात येईल, असे पालिकेकडून सांगण्यात आले.

ऑक्टोबरपासून मुंबईतील हवेची गुणवत्ता खालावते आणि मुंबईला प्रदूषणाचा विळखा बसतो. विशेष करून हिवाळ्यात हवेची गुणवत्ता खालावत असल्याचे निदर्शनास आले आहे. मुंबईतील हवेची गुणवत्ता खालावण्यास मुंबईतील पाच हजार बांधकामे कारणीभूत असल्याचे पालिकेच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे गतवर्षी पालिकेने कठोर कारवाई करीत १५ ऑक्टोबर रोजी २७ प्रकारची नियमावली जाहीर केली आहे. या नियमांमध्ये वाढ करताना यावर्षी बांधकामांच्या ठिकाणी स्वयंपाक बनवण्यास, शेकोटी पेटवण्यासही बंदी घालण्यात आली आहे. यानुसार पालिकेच्या वॉर्ड स्तरावर सब इंजिनीयरच्या टीमच्या माध्यमातून बांधकामांची पाहणी करून प्रदूषण नियंत्रणाची नियमावली पाळण्यात आली नसल्यास कारवाई करण्यात येत आहे.

या कारवाईचा वेग वाढवण्यात आला असून पालिकेने मुंबई सेंट्रल आणि महालक्ष्मी दरम्यानच्या मेट्रो स्टेशन कामाला आणि बीकेसी येथील बुलेट ट्रेनच्या कामालाही कारणे दाखवा नोटीस बजावल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

मुंबईत सध्या मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू आहेत. त्याचा फटका हवेच्या गुणवत्तेला बसत आहे. मुंबईतील हवेची गुणवत्ता खालावली आहे. त्यात अलिकडच्या काही वर्षात वाढ झाल्याचे दिसते. त्यामुळे सकाळच्या सत्रात मुंबईतील काही भागांत धुक्याची चादर पसरलेली दिसते. दरम्यान खालावत चाललेली हवेची गुणवत्ता रोखण्यासाठी मुंबई पालिका सतर्क झाली आहे. प्रदूषण रोखण्यासाठी पालिकेने नियमावली केली आहे. या नियमावलीचे उल्लंघन करणाऱ्यांवर पालिकेतर्फे नोटीस बजावण्यात येत आहे. त्यानुसार प्रदूषण नियंत्रणाचे नियम मोडणाऱ्या बुलेट ट्रेन, ४७४ बांधकामांना पालिकेने नोटीस बजावली आहे.

## कूपर रुग्णालयात ४३ टक्के पदे रिक्त
### तब्बल ५७० जागांवर नियुक्त्याच नाहीत

**मुंबई**

पालिकेच्या मुख्य रुग्णालयापैकी आणि पश्चिम उपनगरातील महत्त्वाचे रुग्णालय असलेल्या कूपर रुग्णालयात एकूण शेड्युल्ड पदांपैकी तब्बल ४३ टक्के हणजेच ५७० पदे रिक्त आहेत.



त्यातच नवीन विभाग सुरू करण्यात येत असल्याने कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे. त्यामुळे रुग्णालयातील रिक्त पदे तातडीने भरण्यात यावी, अशी मागणी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

विलेपार्ले येथे असलेले कूपर रुग्णालयाची स्थापना १९७० मध्ये करण्यात आली. रुग्णालय स्थापन करताना रचना व कार्यपध्दती विभागाने सखोल अभ्यास करुन रुग्णालयातील विभाग, रुग्ण खाटा इत्यादीची संख्या विचारात घेऊन कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची शेडयुल्ड पदे किती असावीत याची निश्चिती केली होती. त्यानुसार रुग्णालयामध्ये १२९० शेडयुल्ड पदे निश्चित करण्यात आली होती. निश्चित केलेल्या पदानुसार रुग्णालयात पालिका प्रशासनाकडून पद भरती करण्यात आली. मात्र मागील काही वर्षांपासून निवृत्त होणारे कर्मचारी आणि इतर कारणांमुळे रिक्त होणाऱ्या पदांची भरती मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आली नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे.

एकीकडे कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याकडे पालिका प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असताना रुग्णांना अधिक चांगले उपचार मिळावेत यासाठी रुग्णालयामध्ये मागील काही वर्षांमध्ये नवनवीन विभाग सुरू करण्यात येत आहेत. मात्र या विभागांमध्ये नवीन कर्मचारी उपलब्ध करून दिले जात नाहीत. कार्यरत कर्मचाऱ्यांवर या रुग्णसेवेचा भार सोपविण्यात येत आहे. त्यामुळे सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे. याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावरही होत आहे. रुग्णालयातील रिक्त पदे भरली जात नसल्याने एकूण १२९० शेड्युल्ड पदांपैकी तब्बल ५७० म्हणजे ४३ टक्के पदे रिक्त आहेत. यामध्ये सर्वाधिक रिक्त पदे ही कर्मचारी वर्गातील २७७ पदे रिक्त आहेत. कर्मचाऱ्यांवर पडणारा ताण कमी करण्यासाठी आणि रुग्णसेवा सुरळीत सुरू ठेवता यावी यासाठी कूपर रुग्णालयातील ५७० रिक्त पदे तत्काळ भरण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशी विनंती म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचे अध्यक्ष बाबा कदम आणि उपाध्यक्ष डॉ. संजय कांबळे मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे केली आहे.

## मंत्रिपद न मिळाल्यामुळे महायुतीतील नेते नाराज
### अधिवेशन सोडून अनेक जण आपापल्या मतदार संघात परतले

**नागपूर**






राज्य मंत्रिमंडळाच्या विस्तारानंतर भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक आमदारांनी मंत्रिपद न मिळाल्यामुळे उघडपणे नाराजी व्यक्त केली. यामध्ये छगन भुजबळ, सुधीर मुनगंटीवार , नरेंद्र भोंडेकर, प्रकाश सुर्वे , विजय शिवतारे, राजेंद्र गावित, रवी राणा नाराज आहेत. याचे पडसाद नागपूरात सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनात देखील दिसले. छगन भुजबळ यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली. तर सुधीर मुनगंटीवर हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी अनुपस्थित राहिले. काल संध्याकाळीच तानाजी सावंत बॅग घेऊन पुण्यासाठी रवाना झाले. तानाजी सावंत देखील आज अधिवेशनाला अनुपस्थित होते.

मंत्रिपद न मिळाल्यानं छगन भुजबळ नाराज झालेत. भुजबळांच्या नाराजीची दखल राष्ट्रवादीनं घेतली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष आणि अजित पवारांचे निकटवर्तीय प्रमोद हिंदुराव यांनी रेडिसन ब्ल्यू हॉटेलमध्ये छगन भुजबळ यांची भेट घेतली..राष्ट्रवादी पक्षाकडून छगन भुजबळांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र आज विधिमंडळ परिसरात प्रतिक्रिया देताना भुजबळांनी जाहीर नाराजी व्यक्त केलेय. मी सामान्य कार्यकर्ता, मला डावललं किंवा बाजूला फेकलं तरी फरक पडत नाही, असं म्हणत भुजबळांनी नाराजी व्यक्त केली. तसेच मनोज जरांगेंना अंगावर घेतलं, त्याचं बक्षीस मिळालं, अशी प्रतिक्रिया देखील छगन भुजबळांनी दिली. यानंतर छगन भुजबळ अधिवेशन सोडून तातडीने नाशिकसाठी रवाना झाले.

दरम्यान, मंत्रिमंडळातून वगळल्याने भाजपचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार देखील नाराज असल्याची चर्चा रंगली होती. याचदरम्यान आज सुधीर मुनगंटीवार विधीमंडळाच्या कामकाजाला अनुपस्थित राहिले. त्यामुळे नाराजीच्या चर्चांना चांगलेच उधाण आले. यानंतर सुधीर मुनगंटीवार यांनी नाराजीच्या चर्चा फेटाळल्या.

### रवी राणा अमरावतीला परत



तानाजी सावंत यांना मंत्रिपदाची संधी न मिळाल्याने ते नाराज असल्याची चर्चा असतानाच भाजपचे रवी राणा अधिवेशन सोडून नाराज होऊन अमरावतीत परतले. अमरावती जिल्ह्यात यावेळी प्रथमच आठ पैकी सात जागांवर महायुतीचे आमदार आहेत. भाजपचे पाच आमदार जिल्ह्यात असले तरी एकही मंत्रीपद न दिल्याने राणा समर्थकांकडून सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल होत आहेत. जिल्ह्याला मंत्रिपद नसल्याने राणा दाम्पत्य कमालीचे नाराज असल्याचं समजते आहे.

पण त्यांची खदखद बाहेर आली. देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळेंनी मंत्रिपदाबद्दल सांगितलं होते, असंही सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

तानाजी सावंत काल शपथविधी सुरू असताना राजभवनाकडे फिरकले देखील नाही. काल तानाजी सावंत हे नागपूरच्या रेडिसन्स ब्लू हॉटेलमधून बॅग पॅक करून निघून गेले होते. आजपासून अधिवेशन असल्याने सर्व आमदारा नागपुरात असताना तानाजी सावंत माघारी परतले होते. त्यामुळे त्यांच्या नाराजीच्या चर्चांनी जोर धरला होता. तब्येत ठीक नसल्याने तानाजी सावंत पुण्याला परतल्याची माहिती त्यांच्या कार्यालयाने दिली. कोलेस्ट्रॉल वाढल्याने डॉक्टरांकडून विश्रांतीचा सल्ला दिल्याचे सांगितले आहे. तसेच आपण नाराज नसल्याचे तानाजी सावंत यांच्याकडून सांगण्यात येत आहे. सध्या तानाजी सावंत पुण्यात असल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, आम्हाला मिळालेल्या वागणुकीचे वाईट वाटते. तिन्ही नेते साधे भेटायला तयार नाहीत. मंत्रीपद न मिळाल्यामुळे नाराजी 100 टक्के आहे. आता अडीच वर्षांनी मंत्रीपद दिले तरी मी घेणार नाही. मला मंत्रिपदाची गरज नाही. मला माझ्या मतदारसंघातील कामे मुख्यमंत्र्यांकडून करुन घेणे अधिक महत्त्वाचे वाटते. मंत्रिपदाबाबत मला राग नाही. पण दिलेल्या वागणुकीबद्दल प्रचंड राग आहे, असे विजय शिवतारे म्हणाले.

दरम्यान, नाराज आमदारांची समजूत काढण्याचा प्रयत्न शिवसेनेच्या गटातून सुरू असल्याची माहिती मिळत आहे. मीडियाच्या माध्यमातून नाराजीला वाचा फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर मात्र एकनाथ शिंदे हे नाराज झाल्याचे देखील समजते. त्यामुळे नाराजी व्यक्त केलेल्या आमदारांना नाराजीचा फटका बसण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे. त्यामुळे श्रध्दा आणि सबुरी ठेवणाऱ्यांनाच भविष्यात शिवसेनेकडून मंत्रीपदं मिळतील, अशी राजकीय वर्तुळात रंगली आहे.

## बीड प्रकरणातील आरोपींवर कडक कारवाई करणार - मुख्यमंत्री

**नागपूर**



बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील घटना गंभीर असून यास सरकारने गांभीर्याने घेतले आहे. संबंधीत आरोपी व दोषी पोलीसांवर कारवाई करण्यात आली असून या प्रकरणातील आणखी कोणी दोषी आढळल्यास त्यांच्यावरही कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी 289 अन्वये उपस्थित केलेल्या बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येविषयीच्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या घटनेसाठी 'सीआयडी'ची एक विशेष एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. तांत्रिक व कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून या प्रकरणाची चौकशी करण्यात येणार असून फरार आरोपींना लवकरच पकडण्यात येईल. या प्रकरणात एका पोलीस अधिकाऱ्यांस सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले असून एकास निलंबित करण्यात आले आहे. आरोपी कोणत्याही जाती, धर्माचा किंवा राजकीय पक्षाचा असला तरी तसेच कोणत्याही दबावाचा विचार न करता यासंदर्भात कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

दरम्यान, विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशन सत्रात विरोधी पक्षातील सदस्यांना माझे आवाहन आहे त्यांनी पाहिजे ती चर्चा करावी, सरकार उत्तर द्यायला सक्षम आहे. आम्ही कुठेही कमी पडणार नाही. 35 हजार कोटींच्या पुरवणी मागण्या मांडल्या आहेत, त्या मंजूर होतील. आपला अर्थ संकल्प मोठा आहे, जेव्हा पासून डिजिटल सिस्टीम सुरू केली तेव्हापासून अजून मागण्या वाढल्या आहेत. तसेच योग्य चर्चा करून त्या मंजूर करू, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

ओबीसीबद्दल बोलायचा काँग्रेसला अधिकार नाही. त्यांनी इतक्या वर्षात केवळ अन्याय केला. महाराष्ट्रात ओबीसी समाजासाठी 48 जीआर आम्ही काढले, ओबीसी मंत्रालय स्थापन केले, रोजगाराची व्यवस्था, पी एच डीची व्यवस्था आम्ही केली, तर काँग्रेसला दाखवण्यासारखे काही काम नाही. इतक्या वर्षानंतर ओबीसी समाजाला सांविधानिक दर्जा मोदी साहेबांनी दिली. सर्वाधिक ओबीसी मंत्री आमच्या मंत्रिमंडळात बघायला मिळतात. काँग्रेसमध्ये पटोले आणि वडेट्टीवार यांच्यावर अन्याय होतो, तो आमच्यावर काढतात.असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### पक्षाने काहीतरी विचार करून मुनगंटावारांना मंत्रिमंडळात घेतले नाही

सुधीर भाऊ आमचे ज्येष्ठ नेते असून त्यांच्याशी आमचे बोलणे झाले आहे. पक्षाने त्यांना विशेष जबाबदारी देण्याचे ठरवले आहे. सुधीर मुनगंटीवार ज्येष्ठ नेते आहेत, त्यामुळे आमच्या पक्षाने काहीतरी विचार करून त्यांना मंत्रिमंडळात घेतले नाही, असे स्पष्टोक्ती देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी या चर्चेला पूर्णविराम दिला असल्याचे बोलले जात आहे.

## अंधेरीतील पार्किंगचा ठेका हुतात्म्यांच्या वारसांना

**मुंबई**

अंधेरी पश्चिमेकडील पार्किंगचा ठेका संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील हुतात्म्यांच्या वारसांना देण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने घेतला आहे. यातून हुतात्म्यांच्या वारसांचा उदरनिर्वाह होणार असून मुंबई महानगरपालिकेचीही दोन वर्षांत तब्बल ६२ लाख रुपयांची कमाई होणार आहे.संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील हुतात्म्यांच्या वारसांना स्वतःचा उदरनिर्वाह करता यावा यासाठी मुंबईतील काही पार्किंगचा ठेका त्यांना देण्यात यावा अशी मागणी गेल्या कित्येक वर्षापासून होत होती. त्यानुसार महापालिकेने मुंबई शहर व उपनगरात असलेले पार्किंग क्षेत्र हुतात्म्यांच्या वारसांना कंत्राट पद्धतीने देण्यात येत आहे. या अगोदर दक्षिण मुंबईतील काही पार्किंग क्षेत्र हुतात्म्यांच्या वारसांना देण्यात आले होते.

आता पालिकेच्या अंधेरी के पश्चिम विभागातील बलराज सहानी मार्ग येथील पार्किंग क्षेत्र हुतात्म्यांच्या वारसांना देण्यात येणार आहे. यासाठी पालिकेने निविदा प्रक्रिया राबवली आहे. ही निविदा प्रक्रिया १५ दिवसांत पूर्ण करून पार्किंग क्षेत्र हुतात्म्यांच्या वारसांच्या ताब्यात देण्यात येणार आहे. हुतात्म्यांच्या वारसांसह या पार्किंगसाठी महिला बचत गटाचाही विचार करण्यात आला आहे. या पार्किंगसाठी हुतात्म्यांच्या वारसांकडून प्रतिसाद न मिळाल्यास महिला बचत गटाला हे पार्किंग क्षेत्र दोन वर्षांसाठी देण्यात येणार आहे. पालिकेच्या सांताक्रुझ एच पूर्व विभागातील नाना धर्माधिकारी मार्गालगतचे पार्किंग क्षेत्र खुल्या प्रवर्गासाठी ठेवण्यात आले आहे. त्यामुळे या पार्किंग क्षेत्रासाठी नोंदणीकृत कोणती संस्था अथवा कंत्राटदार अर्ज करू शकतो. या पार्किंग क्षेत्रासाठी १ लाख १० हजार इसारा रक्कम घेण्यात येणार असून १५ हजार निविदा शुल्क आकारले जाणार आहे. या पार्किंग क्षेत्रातून मुंबई महापालिकेला ५५ लाख ४६ हजार रुपये उत्पन्न मिळणार आहे.

## सिद्दीकी हत्या प्रकरणातील शुभम लोणकर देसाईमुळे बिश्नोई गँगमध्ये

**मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्येतील मुख्य आरोपी मास्टरमाईंड शुभम लोणकर याच्यासंबंधित एक महत्त्वाचा खुलासा समोर आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, देसाई नावाच्या व्यक्तीने लोणकर याला कुख्यात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई याच्या गँगमध्ये आणले होते, असे उघडकीस आले आहे. २०१८ला शुभम लोणकर लष्करात भरती होण्यासाठी राजस्थान, जैसलमेरला गेला होता. मात्र, निवड प्रक्रियेत तो पास होऊ शकला नव्हता. याच ठिकाणी त्याची भेट देसाई नावाच्या इसमाशी झाली. देसाईनेच लोणकर याची ओळख लॉरेन्सच्या जैसलमेर येथील सभासदाशी करून दिली. त्यानंतरच लोणकरला प्रशिक्षणा साठी गँगमार्फत नेपाळला पाठविण्यात आले होते. प्रशिक्षणानंतर परत आल्यावर लोणकर याने गँगसाठी नवीन तरुणांची भरती करण्याचे काम सुरू केले. लोणकरला यापूर्वी अकोला जिल्ह्यातील पोलिसांनी अटक केली होती. त्यावेळीच त्याने देसाई आणि बिश्नोई गँगशी आपले संबंध असल्याची माहिती पोलिसांना दिली होती. परंतु त्यावेळी या माहितीचे गांभीर्य पोलिसांना जाणवले नाही.

## भुजबळांना मंत्रिमंडळातून डावलणे म्हणजे ओबीसी चळवळीवर अन्याय : वडेट्टीवार

**नागपूर**

महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार पार पडलाय. नव्या सरकारमध्ये 39 नेत्यांना मंत्रिपदाची संधी देण्यात आली आहे. यामध्ये 33 कॅबिनेट तर 6 राज्यमंत्री आहेत. भाजपमधील 19 नेत्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. शिंदेंच्या शिवसेनेतील 11 नेत्यांनी तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील 9 नेत्यांना मंत्रिपदाची संधी देण्यात आली आहे. महत्त्वाचं म्हणजे, अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना मंत्रिपदापासून वंचित ठेवण्यात आलं आहे. यावर छगन भुजबळ यांनी नाराजीही व्यक्त केली आहे. दरम्यान, आता छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात स्थान न दिल्याने काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारवर जोरदार टीका केली आहे. ते नागपूरमध्ये बोलत होते. छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळातून डावलने फक्त हा छगन भुजबळ यांच्यावरचा अन्याय नाही तर तो ओबीसी चळवळीवरचाच अन्याय आहे, असं मत काँग्रेसचे जेष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केले आहे. सरकारवर व त्यांच्या मंत्र्यांवर अंकुश ठेवायला विरोधी पक्ष सभागृहात गरजेचा असतो. विधानसभा अध्यक्ष राज्य सरकारने बनवला असतो. त्यामुळे विरोधीपक्ष नेता बनवने हे राज्य सरकारच्या इच्छेवर अवलंबून असल्याचे वडेट्टीवार म्हणाले. छगन भुजबळ यांच्या अन्याय झाला आहे. त्यांना संसदीय कामकाजाचा मोठा अनुभव आहे. ते विरोधात एकटे आमदार असतांना सभागृह गाजवून टाकायचे. त्यांच्या पक्षात काय स्पर्धा आहे यावर मी बोलणार नाही. मात्र मी त्यांच्यासोबत काम केले आहे छगन भुजबळांवर अन्याय झाल्याचे जितेंद्र आव्हाड म्हणाले.

### अजितदादांनी भुजबळांसाठी मोठी संधी राखून ठेवली असेल : अमोल मिटकरी

अमोल मिटकरी म्हणाले, भुजबळ नाराज नाहीत चुकीची बातमी चालवली जात आहे. भुजबळ म्हणत असतील 'जहा पर मन नही लगता वाहा पर क्या रहना' तर त्यांची ही देखील आवडीची ओळ आहे की ' तेरे बिना दिल नही लगता'. भुजबळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा आत्मा आहे. त्यामुळे आत्मा शरीर सोडून जात नसतो. भुजबळ यांना मंत्रिपद मिळाल नाही याचा अर्थ असा की अजित पवारांनी त्यांच्यासाठी मोठी संधी राखून ठेवली असेल. अजित पवार (Ajit Pawar) कुणावर अन्याय करत नाहीत.

## अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधीपक्ष आक्रमक
### ईव्हीएम व बीड, परभणीतील मुद्द्यांवर विधानभवनाच्या पायऱ्यांवर घोषणाबाजी

**नागपूर**



अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी परभणी व बीड मधील घटनांचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. संविधानाची विटंबना व सरपंचाची निघृण हत्या या दोन्ही घटना भाजपा सरकार आल्यानंतर घडल्या आहेत. परभणीत एका आंबेडकरी विचाराच्या कार्यकर्त्याचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला आहे. या घटना अत्यंत गंभीर असून आंबेडकरी अनुयायी व राज्यातील जनतेत प्रचंड संताप आहे. सरकारने या मुद्द्यांवर उत्तर द्यायची तयारी दाखववावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधानसभेत परभणी व बीडच्या घटनांचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर सरकारच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा अध्यक्ष ज्या दिवशी चर्चा करण्यास सांगतील त्या दिवशी चर्चा करू असे आश्वासन दिले. त्यानंतर विधीमंडळ परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांना किडनॅप केल्याची माहिती पोलिसांना होती पण देशमुख यांची अत्यंत निघृण पद्धतीने हत्या करण्यात आल्यानंतर पोलीस सक्रीय झाले. भाजपा सरकार आल्यानंतर दलित व बहुजन समाजावर अत्याचार केले जात आहेत का? ईव्हीएम सरकारने राज्यात राजकीय हत्यासत्र सुरु केले आहे का? असे प्रश्न पटोले यांनी उपस्थित केले.

परभणीतील सोमनाथ सुर्यवंशी यांना कोठडीत असताना पोलिसांनी प्रचंड हालहाल करून मारण्यात आल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे शवविच्छेदन अहवालात स्पष्ट झाले असून ही सरकार प्रायोजीत हत्या आहे. याप्रकरणी सरकारवरच हत्येचा गुन्हा दाखल केला पाहिजे अशी मागणी नाना पटोले यांनी केली आहे.

परभणीच्या मुद्द्यावर बोलताना नाना पटोले म्हणाले की, संविधानाची विटंबना केल्याप्रकरणी पवार नावाच्या इसमाला पोलिसांनी अटक केली असून तो मनोरुग्ण असल्याचे सांगितले जाते परंतु तो व्यक्ती बांग्ला देशातील हिंदूवरील अत्याचार प्रकरणी काढण्यात आलेल्या मोर्चात सहभागी झाला होता. सरपंच संतोष देशमुख सुद्दा हिंदूच आहे, त्यांचे हातपाय कापले, मृत्यूनंतर त्यांच्या शरिरावर आरोपी नाचले, त्यांना काय म्हणणार. बांग्ला देशातील हिंदू सुरक्षित नाहीत म्हणता मग भारतातील हिंदूंच्या संरक्षणाचे काय, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. परभणी व बीडचे प्रकरण मारकडवडीच्या ईव्हीएम विरोधातील मुद्द्यावरून लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न तर नाही ना अशी शंका येते असेही नाना पटोले म्हणाले.

माजी मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या बंगल्यावर वैभव नावाच्या मुलाला किडनॅप करून ठेवले आहे. ९ कोटी रुपयांसाठी त्याला किडनॅप केले असून त्याच्याकडून ४.५ कोटी रुपये वसून केले आहेत, बाकीच्या ४.५ कोटी रुपयाच्या वसुलीसाठी त्याच्यावर अत्याचार केले जात आहेत. ही कसली वसुली आहे ? एवढे पैसे चव्हाणांकडे आले कुठून, असा प्रश्नही नाना पटोले यांनी विचारला आहे.

विधानसभेच्या पहिल्याच दिवशी महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधिमंडळाच्या पायऱ्यावर आंदोलन केले. ईव्हीएम हटाव व परभणी तसेच बीडच्या मुद्द्यांवर यावेळी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

## मी मुख्यमंत्री असतो तर मंत्रिपदासाठी नांदेडचा विचार केला असता- अशोक चव्हाण

**नांदेड**



राज्यात महायुतीचे संख्याबळ 236 हून अधिक असून, भाजपाला 132 जागा मिळाल्या आहेत. विशेष म्हणजे नांदेड जिल्ह्यात महायुतीचे नऊ उमेदवार निवडून आले असले तरी भाजपाचे पाच उमेदवार निवडून आणण्यात अशोक चव्हाण यांना मोठे यश मिळालंय. परंतु तरीही नांदेड जिल्ह्याला एकही मंत्रिपद नसल्याने अशोक चव्हाण यांची ताकद कमी पडली का अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झालीय. राज्यात मंत्रिमंडळाचा विस्तार रविवारी पार पडला असून, राज्यात एकूण 39 मंत्र्यांचा शपथविधी रविवारी नागपूर झालाय. पण नांदेडला एकही मंत्रिपद मिळालेले नाही.

राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काँग्रेसमधून भाजपामध्ये प्रवेश केल्यानंतर त्यांना भाजपाने राज्यसभेवर नियुक्ती करून खासदार बनवलं. अशोक चव्हाण यांचे समर्थकदेखील भाजपामध्ये सामील झाले. 2024 च्या विधानसभेत नांदेड जिल्ह्यात 9 पैकी 9 उमेदवार विजय झालेत, भाजपाचे पाच आमदार विजय झालेत. अशोक चव्हाण यांनी प्रतिष्ठा पणाला लावत प्रचार यंत्रणा राबवली आणि महायुतीसह भाजपाचे पाच, शिवसेना शिंदे गटाचे तीन आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा गटाचा एक आमदार निवडून आणला तरी देखील नांदेडला एकही मंत्रिपद मिळाले नसल्यानं राजकीय वर्तुळात तो चर्चेचा विषय ठरत आहे.

विशेष म्हणजे यावर आता अशोक चव्हाणांनीही प्रतिक्रिया दिलीय. महाराष्ट्रात स्थिर सरकार स्थापन झालेलं आहे. अधिवेशनही सुरू झालंय. मंत्रिमंडळाचा विस्तार सर्वसमावेशक झालेला आहे. अडीच वर्ष काही आमदारांना आणि नंतर अडीच वर्ष काही आमदारांना संधी मिळणार आहे. फडणवीसांच्या नेतृत्वात अजित पवार आणि एकनाथ शिंदे चांगलं काम करतील. परभणी, बीडला संधी मिळाली, आम्हाला त्याचाही आनंद आहे. इतर जिल्ह्यांनाही संधी मिळालाय हवी होती, ती भविष्यात कधी तरी मिळेलच. मी मुख्यमंत्री असतो तर नांदेडला मंत्रिपद देण्याचा विचार केला असता, असंही अशोक चव्हाण म्हणालेत.

## परभणी प्रकरणावरून सुषमा अंधारेंचा पोलिसांवर गंभीर आरोप

**मुंबई**

परभणीत भाजपने निळे गमछे गळयात घालून आपल्या लोकांना रस्त्यावर उतरवून तोडफोड केली. मात्र, पोलिसांनी ज्या लोकांचा या सगळ्याशी काहीही संबंध नाही, अशा लोकांवर गुन्हे दाखल केले आहेत. या आरोपींमध्ये समावेश असलेल्या सोमनाथ सूर्यवंशी याला पोलीस कोठडीत अमानुष मारहाण झाल्याने मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केला. त्या सोमवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होत्या. सोमनाथ सूर्यवंशी हा कायद्याचे शिक्षण घेणारा विद्यार्थी होता, तो लॉ अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या वर्षाला शिकत होता. परभणी हिंसाचारावेळी सोमनाथ सूर्यवंशी हा फक्त व्हिडीओ रेकॉर्ड करत होता. पण पोलिसांनी त्याला बेदम मारहाण केली. त्याच्या अंगावर धारदार शस्त्राने वार केल्याप्रमाणे खुणा दिसत होत्या. तो पोलिसांच्या अमानुष मारहाणीचा बळी ठरला. तो न्यायालयीन कोठडीत असला तरी त्याचा मृत्यू पोलीस कोठडीतील अमानुष मारहाणीमुळे झाला, असा गंभीर आरोप सुषमा अंधारे यांनी केला यावेळी सुषमा अंधारे यांनी पोलीस खात्यावर गंभीर आरोप केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात लक्ष घालावे. आम्हाला त्यांच्याकडून खूप अपेक्षा आहेत. आमची मागणी आहे की, पोलीस निरीक्षक शरद मरे, पोलीस उपनिरीक्षक तुरनर, स्थानिक गुन्हे शाखेचे गोरगांड या तीन अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करुन स्वतंत्र चौकशी करावी. तसे केले नाही तर मला दोन दिवसांनी परभणीत येऊन बसावे लागेल, असा इशारा सुषमा अंधारे यांनी दिला.



यावेळी सुषमा अंधारे यांनी मृत सोमनाथ सूर्यवंशी याच्या अंगावरील मारहाणीच्या खुणा असलेला फोटो सगळ्यांना दाखवला. तसेच पोलिसांच्या कार्यपद्धतीवर आणि दाखल केलेल्या गुन्ह्यांबाबत संशय व्यक्त केला. विजय वाकोडे हा जुना पँथरचा माणूस आहे, त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शारीरिक व्याधीमुळे विजय वाकोडे जागेवरुन हलू शकत नाहीत. हा माणूस रस्त्यावर येऊन तोडफोड करु शकत नाही. तर रवी सोनकांबळे हा माजी नगरसेवक होता. हा अत्यंत समंजस व्यक्ती आहे. रवी सोनकांबळे याने अनेक वर्षे परभणीतील शांतता कमिटीत काम केले आहे. पोलिसांनी एकाच कुटुंबातील सगळ्या व्यक्तींवर गुन्हे दाखल केले आहेत. जेणेकरून जामीन घ्यायला कोणी शिल्लकच राहिले नाही पाहिजे, असे सुषमा अंधारे यांनी म्हटले.

## पहिल्याच दिवशी 35,788 कोटींच्या पुरवणी मागण्या

**नागपूर**

नागपूरमध्ये आजपासून हिवाळी अधिवेशनाची सुरुवात झाली आहे. या अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारकडून आज 33,788.40 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या आहेत. यामध्ये 1400 कोटी रुपयांची तरतूद मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी करण्यात आली.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही यापुढेही कायम सुरू राहणार असून याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा केली आहे. राज्यातल्या लाडकी बहीण योजनेसाठी 1400 कोटी रुपयांची तरतूद केली असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ही रक्कम नेमकी कशासाठी मंजूर करण्यात आली हे देखील स्पष्ट झाले आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विधानसभेत 35 हजार 788 कोटी रुपयांच्या पुरवण्या मागण्या मांडण्यात आल्या. यामध्ये लाडकी बहीण योजनेसाठी सरकारकडून 1400 कोटी रुपयांची पुरवणी मागणी सादर करण्यात आली. याशिवाय, मुंबई मेट्रो 3 साठी 655 कोटींची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. राजकोटवरच्या शिवरायांच्या पुतळ्यासाठी राज्य सरकारकडून 36 कोटी रुपये देण्यात येणार आहेत.तर या पुतळ्याचे कंत्राट सुप्रसिद्ध मूर्तीकार राम सुतार यांना देण्यात आले आहे. एकूण पुरवणी मागण्यांपैकी सर्वाधिक म्हणजेच 7 हजार 490.24 कोटी रुपयांचा निधी हा सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात येणार आहे. त्यापैकी 3 हजार 195 कोटी रुपये हे केंद्र सरकारकडून राज्य सरकारला बिनव्याजी देण्यात आले आहेत.

हा निधी इमारती, रस्ते आणि पूल बांधण्यासाठी होणार आहे.पुरवणी मागण्यांपैकी 3 हजार 50 कोटी रुपयांचा निधी हा मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज अतंर्गत वापरण्यात येणार आहे. तर साखर कारखान्यांना कर्ज देण्यासाठी 1204 कोटी तर दुध उत्पादक शेतकऱ्यांना 758 कोटी रुपये कर्ज देण्यासाठी वापरले जाणार आहेत. राज्याचे मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत या पुरवणी मागण्या मांडल्या आहेत.

## सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरण : बंदला संमिश्र प्रतिसाद

**परभणी**



परभणीत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयासमोरील संविधान शिल्पाची तोडफोड झाल्यानंतर पुकारण्यात आलेल्या बंद आंदोलनाला हिंसक वळण लागले होते. या प्रकरणी पोलिसांनी ५० जणांना अटक केली होती. यातील सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला. या घटनेच्या निषेधार्थ आज महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली हे. आनंदराज आंबेडकर यांनी परभणीसह महाराष्ट्र बंदची हाक दिली असून या पार्श्वभूमीवर आज परभणीत चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तर राज्यभरात या बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला आहे. परभणी रेल्वे स्थानकाबाहेर डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात असलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करण्यात आल्याने याचे हिंसक परिणाम परभणीत उमटले. परभणीत मोठ्या प्रमाणात तोंडफोड, जाळपोळ व दगडफेक करण्यात आली होती. पोलिसांनी काही जणांना अटक देखील केली होती. यातील सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला होता. सूर्यवंशी याचा मृत्यू हा संशयास्पद असल्याने या प्रकरणी चौकशीची मागणी करत आंबेडकरी संघटनांनी रविवारी रात्री बैठकीत परभणी व महाराष्ट्र बंदची हाक दिली. आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालय समोरील मैदानामध्ये विविध संघटनांतर्फे आंदोलन करण्यात आलेआहे.

राज्यभरात पुकारण्यात आलेल्या बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला आहे. काही ठिकाणी व्यावसाईकांनी बंदला प्रतिसाद देत दुकाने बंद ठेवली होती. तर काही ठिकाणी सर्व व्यवहार सुरळीत सुरू होते. परभणीत या बंदला प्रतिसाद मिळाला. अनेक दुकाने ही बंद ठेवण्यात आली. तर पोलिसांनी देखील गैर प्रकार टाळण्यासाठी चोख बंदोबस्त ठेवला आहे.

### प्रकाश आंबेडकरांनी शेअर केला पोस्टमॉर्टम रिपोर्ट

सोमनाथ सूर्यवंशी यांच्यावर छत्रपती संभाजीनगरच्या घाटी हॉस्पिटलमध्ये शवविच्छेदन करण्यात आले. त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रकाश आंबेडकर यांनी त्याचा फोटो ट्विटरवर पोस्ट केला. शवविच्छेदनाच्या अहवालामध्ये सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू मारहाणीमुळे झालेल्या जखमा आणि अटॅकमुळे झाल्याचे नमूद करण्यात आले. दरम्यान, सोमनाथ सूर्यवंशीच्या मृत्युला जबाबदार असलेल्या पोलिसांना निलंबित करा, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदेंनी केली.

## जयंत पाटील, रोहित पवारांना मंत्रिमंडळात घेण्यासाठीच अजित पवारांनी छगन भुजबळांचा बळी घेतला; लक्ष्मण हाकेंची जोरदार टीका

**पुणे**



देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाचा नागपुरात विस्तार करण्यात आला असून अनेक नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली. तर काही ज्येष्ठ चेहेऱ्यांना डावलण्यात देखील आलं. मंत्रिमंडळात जरी 17 ओबीसी नेत्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली असली तरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून माजी मंत्री छगन भुजबळ यांना डावलण्यात आल्यानं ओबीसी आंदोलक तसेच ओबीसी नेते महायुतीवर नाराज झाले आहेत. ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांच्यावर छगन भुजबळ प्रकरणी जोरदार टीका केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, रोहित पवारांना मंत्रिमंडळात घेण्यासाठी अजित पवारांनीच छगन भुजबळांचा बळी घेतला, अशी जोरदार टीका त्यांनी केली.

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांना छगन भुजबळ यांच्याबाबत विचारलं असता, ते म्हणाले की "खरं म्हणजे ओबीसी समाजाचा अनादर करण्यात आलेला आहे. आम्ही महायुतीच्या बाजुनं जाणार आहोत, असा आम्ही निवडणुकीच्या आगोदरच ठामपणे निर्णय घेतला. त्यामुळे संपूर्ण ओबीसी समाजानं महायुतीला भरभरून मतदान केलं. असं असताना ओबीसी समाजाचा आवाज बनणारे गोपीचंद पडळकर तसेच छगन भुजबळ यांना का डावलण्यात आलं आहे. अजित पवार यांनी जे अडीच वर्षाचं सांगितलं आहे, तर अडीच वर्षानंतर ते उपमुख्यमंत्री पद हे छगन भुजबळ यांना देणार आहे का, ? आणि जर ते देणार असतील तर त्यांनी तसं सांगावं," असा सवाल यावेळी हाके यांनी केला.

"एकीकडं धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांना मंत्रिपद दिल्याचा आनंद आहे. पण दुसरीकडं छगन भुजबळ, गोपीचंद पडळकर यांना डावलण्यात आल्यानं या महायुती सरकारनं ओबीसी समाजाचा रोष ओढवून घेतला. सरकारनं मंत्रिमंडळात अनेक ओबीसी चेहरे जरी दिले असले, तरी आम्हाला समाज म्हणून मंत्रिमंडळात छगन भुजबळ पाहिजे होते. पण त्यांना न घेतल्यानं ओबीसी समाजाचा अनादर झाला," असे यावेळी हाके म्हणाले. "गेल्या काही दिवसांतील राजकारण पाहता, अजित पवार यांनी रोहित पवार, जयंत पाटील यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यासाठी भुजबळ यांचा बळी दिला आहे का असा सवाल आम्हाला उपस्थित झाला आहे. अजित पवार हे दिवाळी सारख्या सणाच्या दिवशी बहीण सुप्रिया सुळे यांना भेटत नाहीत. पण शरद पवारांच्या वाढदिवसाच्या निमित्तानं अजित पवार सर्वांना घेऊन जातात, हे मिलीभगत नाही का? तसेच जनतेच्या मनात धूळ फेकण्याचं काम अजित पवार हे करत आहेत. लढायला आम्ही पण तुपाशी जेवणासाठी इतर लोक असून छगन भुजबळांना का डावलण्यात आले आहे, याच उत्तर राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी द्यावे," असे यावेळी हाके म्हणाले.

# संपादकीय

## देवाभाऊंकडून अपेक्षा

महाराष्ट्र हे देशातील पहिल्या चार ते पाच क्रमांकाच्या राज्यात गणले जाणारे राज्य आहे. आज या महाराष्ट्रावर 7.11 लक्ष कोटी रुपयांचे कर्ज आहे. निवडणुकीपूर्वी यावर्षी ज्या विविध योजनांची घोषणा झालेली आहे. त्यामुळे हे कर्ज आठ लक्ष हजार कोटी पर्यंत जाऊ शकते. या आठ लक्ष हजार कोटींच्या होणाऱ्या व्याजावर आपल्याला लक्ष दिले पाहिजे. विकासाचे लक्ष्य साध्य करण्यासाठी जर त्याच्यावर लक्ष दिले नाही. तर विकास कामासाठी पैसाच उभा करता येणार नाही. आता यापुढे राज्याला नवीन कर्ज घेणे गरजेचे असले. तरी ते आता झेपेल काय, असा प्रामाणिक प्रश्न उभा राहणे स्वाभाविक आहे. आता महाराष्ट्रावरील कर्जाची चर्चा करूया. 1995 सालापर्यंत म्हणजे पहिले युती सरकार सत्तेवर येईपर्यंत, महाराष्ट्र हे शिलकीच्या अर्थसंकल्पाचे राज्य होते. पहिल्यांदा युती सरकारच्या काळात महाराष्ट्राने अंदाजे 45 हजार कोटींचे कर्ज घेतले होते. कधीकधी एखाद्या सावकाराकडून कर्ज घेतल्यावर ज्याप्रमाणे एखाद्या कुटुंबाची किंवा व्यवसायाची कर्जावर कर्ज घेऊन कर्जाच्या वर्तुळातच राहण्याची जी सवय होते. त्याप्रमाणे महाराष्ट्राला आता कर्जाची किंवा कर्ज घेण्याची जवळजवळ सवयच झालेली आहे. तसे पाहिले तर महाराष्ट्र हा देशातील सर्वाधिक प्रगत प्रदेश आहे. महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न 2.8 लाख रुपये आहे. म्हणजे ते देशाच्या दरडोई उत्पन्न सरासरीपेक्षा पुष्कळ जास्त आहे. हे सर्व असले तरी गेल्या दहा पंधरा वर्षात देशाच्या उत्पन्नात पंधरा वर्षांपूर्वी जो आपला वाटा जवळजवळ 15 टक्के होता. तो यावर्षी दोन टक्क्यांनी घसरलेला आहे. आपण औद्योगिक आघाडीवर अग्रगण्य होतो, असे आपण म्हणतो. तरी आपल्या राज्याची महसूली तूट जवळजवळ वीस हजार कोटी रुपयांची आहे. आपल्या राज्याच्या वित्तीय तुटीचा विचार केला. तर हा आकडा एक लाख दहा हजार कोटींच्या वर जातो. आम्ही वर उल्लेख केल्याप्रमाणे लाडक्या घोषणांचे आकडे स्वतःच्या उत्पन्नापेक्षा जास्त खर्च असल्यामुळे राज्याला कर्जाच्या घनघोर खड्ड्यात ढकलत आहेत. राज्याच्या वित्त विभागाचे 'पित्त' कितीही भडकले. तरी आमचे आतापर्यंतचे राज्यकर्ते ऐकायला तयार नाहीत. कारण ती राजकीय गरज आहे. हे त्यांनाही ठाऊक आहे आणि वित्त विभागालाही ठाऊक आहे. त्यामुळेच आता सरकारच्या सर्वोच्च पदी बसलेल्या देवेंद्रजी यांच्याकडून प्रगत महाराष्ट्राला अधिक प्रगत करण्यासाठी काही अपेक्षा आहेत. आज अस्मानी आपत्तीमुळे कृषी व्यवसाय समाधानकारक नाही. विकासाचे त्रिकूट मुंबई, पालघर आणि नाशिक या परिसरात फरकट फेऱ्या मारीत आहे. थोडा बहुत अंश आताच्या संभाजीनगर कडे वळलेला असेल तो असेल. बाकी राज्याचे इतर भाग आपले भाग्य उजळण्याची वाट पाहत आहेत. महाराष्ट्रा सारख्या अग्रेसर असलेल्या राज्यातही आजच्या घडीला जवळजवळ 60 टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. शेतकरी वाढलेल्या खर्चापायी अत्यंत बेजार आहेत. कोणे एकेकाळी शेतीसाठी आवश्यक ते बियाणे शेतकरी आपल्या शेतात पिकवून घरामध्येच तयार करीत असत. आता त्या क्षेत्रावर राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांनी कब्जा केलेला आहे. यामुळे देवेंद्रजी तुम्हाला महाराष्ट्राच्या शेतकऱ्याला सावरण्यासाठी उदारहस्ते मातीत राबणाऱ्या बळीराजाला मदत करावी लागेल. आपल्या पुढारलेल्या राज्यात विजेचे जे दर आहेत. ते आपल्याला इतके संकटात नेत आहेत की, त्याच दराला घाबरून अनेक प्रकल्प राज्याबाहेर गेलेले आहेत किंवा जात आहेत. हाच विजेचा दर आपल्यापेक्षा गुजरातमध्ये 50 ते 80 टक्के कमी आहे. त्यामुळे विजेमुळेच वाढणारी महागाई राज्याला अधिकच निराशेच्या खाईत नेत आहेत. म्हणजेच देवेंद्रजी यावरही आपल्याला अधिक लक्ष केंद्रित करावे लागेल. तुम्हाला या सर्वच बाबींकडे प्रामुख्याने लक्ष देणे गरजेचे आहे. जर महाराष्ट्रात महाराष्ट्राच्या विकासासाठी देशांतर्गत किंवा जगातील भांडवल आकर्षित करावयाचे असेल. तर पायाभूत सुविधांकडे, इलेक्ट्रॉनिक उत्पादनासाठी योग्य ते वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. पश्चिम महाराष्ट्र किंवा आम्ही वर उल्लेख केलेले त्रिकूट सोडल्यास ग्रामीण प्रश्न अत्यंत बिकट आहेत. त्यामुळेच उद्योगांना मदत करण्यासाठी आपल्याला मोठेच काम करावे लागणार आहे. एकूणच औद्योगीकरणाकडे वाटचाल करावीच लागेल. त्यामुळेच रोजगार निर्मिती आणि त्यामुळेच राज्याच्या उत्पन्नात भर पडेल. असे ढोबळमानाने विचार केल्यावर आम्हाला खूप महत्त्वाचे वाटते. आपल्या राज्यातील वेगवेगळ्या विभागातील विकासामधील असमतोल समतोल करण्यासाठी देवेंद्रजी यांच्यासारख्या समतोल आणि समन्यायी विचाराच्या प्रशासकाला कोणताही तोल ढळू न देता अतिशय द्रष्टेपणा दाखवून नवनवीन योजनांची आखणी करावी लागेल. पुढील चार वर्षे या दृष्टीने देवेंद्रजी यांनी प्रयत्न करावेत आणि नंतरच्या निवडणुकीच्या वर्षात काय जो सवलतींचा वर्षाव करायचा आहे, तो करून टाकावा. वेळेवर केलेल्या आनंदाच्या वर्षावामुळे जनता मोठ्या प्रमाणावर तुमच्या मागे उभी राहील. हे तुम्ही या आधीही सिद्ध केलेलेच आहे. तेव्हा आता जागा आणि त्या दृष्टीने वागा. इतकीच अपेक्षा!

# इव्हीएमवर निशाणा कशासाठी ?

**निवडणूक आयोगाने इव्हीएम प्रणालीची विश्वासार्हता आणि पारदर्शकता वेळोवेळी सिद्ध केली आहे. लोकसभेच्या, राज्यांमधल्या निवडणुका इव्हीएमद्वारेच घेतल्या जातात. आता महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीच्या दारुण पराभवानंतर अनेक नेत्यांकडून या प्रणालीवर संशय घेतला जात आहे. पराभव झाल्यानंतरच असा संशय घेणे आणि जनमताचा कौल मान्य करण्याऐवजी हा पर्याय निवडणे मतदारांनाही कोड्यात पाडणारा आहे.**

१३ निवडणुकीच्या निकालाचा आनंद लुटणारे विरोधक २० नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीच्या अनपेक्षित निकालाने संभ्रमित झाले. निवडणूक आयोगाने वारंवार प्रणालीद्वारे होत असलेल्या मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता आणि विश्वासार्हता वेळोवेळी सिद्ध केली असतानाही संशय घेणे, अभ्यासू आणि जाणकार मतदारांनादेखील रुचेल की नाही ही शंका आहे. कोट्यवधी मतदार आणि शेकडो पक्ष अशा प्रचंड पसाऱ्यात भारतातील निवडणुका होत असतात. त्यांचा ठराविक असा कार्यकाळ नाही. त्यामुळे भारतात पूर्ण वर्षभर कोणत्या ना कोणत्या राज्यात निवडणुका होत असतात, लोकसभेच्या, विविध राज्यांमधल्या विधानसभेच्या आणि महानगरपालिकांच्याही निवडणुकाही आता इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशिनद्वारेच घेतल्या जाऊ लागल्या आहेत. या इव्हीएम मशिन्तबाबत मतदारांमध्ये नेहमीच कुतूहल आणि विरोधकांमध्ये नेहमीच संशय राहिला आहे. निवडणूक आयोगाच्या मते निवडणुकीच्या किचकट आणि आव्हानात्मक प्रक्रियेत मतदार हा केंद्रस्थानी असतो आणि मताचं पावित्र्य हा सगळ्यात संवेदनशील मुद्दा आहे असे असतानाही महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाविकास आघाडीतल्या अनेक नेत्यांनी इव्हीएम मशिन्सवर संशय व्यक्त केला. लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात आघाडीला मिळालेले यश आणि केवळ सहा महिन्यांमध्येच आघाडीचा झालेला दारुण पराभव, या घटनांमुळे आघाडीच्या ज्येष्ठ नेत्यांकडून प्रणालीवर संशय घेतला जात आहे. जून २०२४ च्या लोकसभेच्या निवडणुकीत 'अब की बार ४०० पार'चा नारा देऊन मैदानात उतरलेल्या भाजपला स्वबळावर सरकार स्थापन करता आले नाही. केंद्रात भाजप आणि मित्रपक्षांचे सरकार स्थापन झाले असले, तरी महाराष्ट्रात युतीला १८ आणि आघाडीला ३० जागा मिळणे अनपेक्षित होते. मतदानाची घसरलेली टक्केवारी असेल, भाजपला संविधान बदलायचे आहे हा विरोधकांकडून झालेला अपप्रचार असेल किंवा इतरही काही कारणे असतील, भाजपने पराभव मान्य केला. आजवर ज्या ज्या वेळी दिल्ली, पंजाब, केरळसारख्या राज्यांमध्ये दारुण पराभव झाला, भाजपने आत्मचिंतनाद्वारे पराभवाची कारणे समजून घेण्याचा प्रयत्न केला. २०१७ मध्ये झालेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्येही भाजपचा दारुण पराभव झाला होता. आपण निवडणुका जिंकतो तेव्हा प्रणाली चांगली असते आणि हरतो तेव्हा त्यात काही तरी गडबड केलेली असते, हा अजब तर्क २०१४ पासून आजवर, म्हणजे गेली दहा वर्षे इव्हीएम मशिन्सविरोधी पक्षांनी उचलून धरला आहे आणि त्याद्वारे म तदानाला नेहमी विरोध दर्शवला आहे. तेच रडगाणे नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्रातील विधानसभेच्या निकालांवरून सुरू केले आहे. इव्हीएम म शिन्सद्वारे घेतलेल्या मतदानाने आजवर तीन तीन निवडणुका जिंकणारे नेते, आज त्याच प्रणालीकडे संशयाने पाहू लागले आहेत. एके काळी एकाच वेळी झालेल्या पाच राज्यांच्या आणि झारखंडमध्ये भाजपच्या झालेल्या पराभवाकडे त्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. खरे तर भारतात सध्या लोकशाही पद्धतीने आणि निष्पक्षपातीपणे निवडणुका पार पाडण्यासाठी वापरात असलेली ही



प्रणाली आदर्श मानावी लागेल,

भारतामध्ये अखंडतेने मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका पार पाडण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाला जागतिक स्तरावर 'गोल्ड स्टैंडर्ड' म्हणून ओळखले जाते. आयोगाने निवडणुकीच्या कार्यक्षम, सुरळीत आणि व्यावसायिक वर्तनाचे नेहमीच उब दजचि मानक स्थापित केले आहेत आणि निवडणूक प्रक्रिया आणि प्रणाली सुधारण्यासाठी नवीनतम प्रगत तंत्रज्ञान स्वीकारण्यात, अवलंबण्यात आणि अंमलात आणण्यात आयोग आघाडीवर आहे. गेल्या वीस वर्षांमध्ये आयोगाने इव्हीएम मशिन्सचा वापर करून राज्य विधानसभेच्या १०७ आणि तीन लोकसभा निवडणुका यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. सप्टेंबर २०१३ पासून, मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता आणि विश्वासार्हता वाढवण्यासाठी विविध राज्यांच्या विधानसभा आणि संसदीय मतदारसंघांमध्ये व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल (व्हीव्हीपॅट) मशिन्सचाही वापर करण्यात आला आहे. दखल मार्च २०१७ मध्ये पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे (यूपी, उत्तराखंड, पंजाब, गोवा आणि मणिपूर) निकाल जाहीर झाल्यानंतर ईव्हीएमच्या कार्यप्रणालीवर काही शंका उपस्थित झाल्या होत्या या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर काही तक्रारी आणि सूचना आयोगाला प्राप्त झाल्या आयोगाने या तक्रारींची रीतसर तपासणी केली आणि दाव्यांना समर्थन देणारे पुरावे आणि विश्वासार्ह सामग्रीची माहिती मागितली, परंतु तक्रारकर्त्यांनी कोणतेही पुरावे दिले नाहीत. तेरा राजकीय पक्षांच्या गटाने दहा एप्रिल २०१७ रोजी आयोगाची भेट घेतली आणि ईव्हीएमच्या वापराबाबत काही आक्षेप व्यक्त केले. काही राजकीय पक्षांनी एप्रिल २०१७ च्या पहिल्या आठवड्यात आलेल्या भिंड (पंजाब) आणि ढोलपूर (राजस्थान) पोटनिवडणुकीत ३१ मार्च २०१७ रोजी (वास्तविक मतदानात नाही) वापरल्या गेलेल्या संबंधित घटनांबद्दलदेखील प्रश्न उपस्थित केले. राजकीय पक्षांच्या चिंता समजून घेण्यासाठी आयोगाने सर्वपक्षीय बैठक बोलावली. त्याच दिवशी पुढील परिणामांसाठी एक प्रेस स्टेटमेंटदेखील जारी करण्यात आले.

आयोगाने राजकीय पक्षांसमोर सांगितले की भविष्यातील सर्व निवडणुका अनिवार्यपणे ईव्हीएमद्वारे घेतल्या जातील. भविष्यातील सर्व निवडणुकांमध्ये सर्व मतदान केंद्रांवर सोबत मशिन्सचा वापर केल्याने



आधारित मतदान व्यवस्थेत कमालीची पारदर्शकता आणि विश्वासार्हता येईल, असा आयोगाचा ठाम विश्वास आहे. प्रत्येक मतदाराला आपले मत योग्य उमेदवाराला गेले आहे की नाही है व्हीव्हीपॅटमध्ये पाहणे शक्य होईल आयोगाने या प्रणालीवर विश्वास व्यक्त केला आहे.

आणि ईव्हीएमची अखंडता, गैरछेडछाड़ आणि चिंचाळकर विश्वासार्हता यावर आयोगाचा ठाम विश्वास आहे. आयोगाने ईव्हीएमचे उत्पादन, वाहतूक, स्टोरेज, मतदान आणि मतमोजणी प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारच्या छेडछाडीपासून संरक्षणाची नेहमी हमी दिली आहे. तरीही या प्रणालीची अखंडता आणि विश्वासार्हता आणखी कशी सुधारता येईल, याविषयी सर्व राजकीय पक्षांच्या सूचना प्राप्त करण्याची ग्वाही आयोगाने आजवर दिली. ईव्हीएमच्या कामकाजाबाबत कोणत्याही प्रकारे संशयाची छटाही जाणवू देणार नाही, हा विश्वासही आयोगाने दिला आहे. बैलेट पेपरद्वारे मलदान घ्यायचा विरोधकांचा आग्रह आश्चर्यजनक म्हणावा लागेल. बिहार आणि उत्तर प्रदेशसारख्या काही राज्यांमध्ये मतपेट्या पळवणे, निवडणूक अधिकाऱ्याऱ्यांना धम कावून मतदान केंद्रे ताब्यात घेणे, मतदारांनी प्रत्यक्षात मतदान केले नसतानाही बॅलेट पेपरवर हव्या त्या उमेदवाराच्या चिन्हावर शिक्के मारणे आणि काही परिस्थितीत तर मतपेट्या चक्क पळवून नेणे, असे प्रकार पूर्वी पडलेले आहेत. अशा परिस्थितीत मतदान प्रक्रियेत पारदर्शकता आणि विश्वासार्हता येण्याच्या दृष्टीने अस्तित्वात आणलेल्या ईव्हीएमप्रणालीचे स्वागतच व्हायला हवे. असे असूनही अलिकडच्या काळात ईव्हीएम मशिन हॅक होऊ शकते का, हा चर्चेचा विषय बनला. बीबीसीचे प्रतिनिधी सौतिक बिस्वास यांनी २०१९ च्या निवडणुकांवेळीही सखोल आढावा घेतला होता. त्यांच्या मले निवडणूक आयोग ही स्वतंत्र स्वायत्त संस्था आहे. मतदान करताना मतदार मशीनवरचे बटण दाबून आपले मत नोंदवतात. आणखी एका बटणाद्वारे, मतदान अधिकारी मतदानाची प्रक्रिया पूर्ण करतात. मतदानाची वेळ संपल्यानंतर हे बटन दाबून प्रक्रिया थांबवली जाते. याव्यतिरिक्त मतदान केंद्र ताब्यात घेतल्यास किंवा मतदान प्रक्रियेत बाधा आणल्यास हे बटन दाबून प्रक्रिया थांबवली जाते. मतदान यंत्राबरोबर कोणतीही छेडछाड होऊ नये यासाठी मतदान अधिकारी लाखेने सीलबंद करतात, निवडणूक आयोगातर्फे पुरवण्यात आलेल्या खास धाग्याने ते बांधले जाते. याला एक सीरियल नंबर दिला जातो. या मशिन्समुळे वेळ वाचतो, तीन ते पाच तासात गणना होऊन एकेका म तदारसंघातील यंत्रातील मतांचा निकाल लागू शकतो. कागदी मतपत्रिका असताना यासाठी ४० तास लागत असत. इव्हीएम मशीन्समुळे अवैध मतांचा मुद्दा निकाली निघाला आहे. यामुळे होणारा पैशाचा अपव्ययही टळला आहे. आयोगाच्या मते इतक्या पारदर्शक आणि सुटसुटीत प्रणालीवर संशय घेणे अनाकलनीय आहे. ईव्हीएमद्वारे घेतलेल्या मतदानाने आजवर तीन तीन निवडणुका जिंकणारे नेते आज या प्रणालीकडे संशयाने पाहू लागले आहेत. या दुटप्पीपणाचे कुठेतरी उत्तर द्यावेच लागेल.

## हरवलेले सुख...

लाख संकटांना मी असंच
धुडकावून लावलं आहे..
दु:खालाही मी आनंदानं
आपलंस केलं आहे,

हृदयात माझ्या काहीच
शिल्लक नाही ठेवलं
प्रेम, माया, आपुलकी
वाटून टाकली सर्वांनाच,

माझ्या आयुष्यात मी
प्रसादासारखा आनंद वाटला
मग दु:ख तरी कसं
येईल हो माझ्या वाट्याला,

मी तर नेहमी प्रेमाच्या
फुलांचीच रोपटी लावली
मग द्वेषाचे काटे तरी
उगवतीलच कसे,

असाच माझा समज होता
पण, कुण्या मांत्रिकानी
कधी मूठ मारली हे
कळलंच नाही मला,

नाती सांभाळावी कशी
सांगू तरी कोणाला,
द्वेष,अहंकाराची वावटळ
घरात जी शिरली आहे,

असून ही सर्व चांगले
जीवन झाले आहे रुक्ष
आपणच आपल्याला
करत आहोत ना भक्ष,

बहरलेली बाग माझी
कोमेजून गेली कशी
दृष्टच लागली कोणाची
कळलंच नाही कधी,

तुटलेली नाती जोडणारा
धागा सापडेल कां कधी
सुख आणी आनंद पुन्हा
वाट्याला येईल तरी कां ?

सांग देवा, सांग मला
हरवलेल्या त्या सुखाची
वाट पहातच, डोळे माझे
मिटणार तर नाही ना ??

**-दिपक बजरंग नलावडे**

## नातं असावं प्रेमाचं...

कुठलं तरी एक नातं असावं
जिथे फक्त प्रेम मिळावं
जिथे राग, द्वेष नसावा

कुठलं तरी एक नातं असावं
जिथे आस्था, आपुलकी असावी
जिथे अहंकार, इगो नसावा

कुठलं तरी एक नातं असावं
जिथे नात्याची ओढ असावी
जिथे मायेतील दुरावा नसावा

कुठलं तरी एक नातं असावं
जिथे संवाद, सुसंवाद असावा
जिथे कसलाच गैरसमज नसावा

कुठलं तरी एक नातं असावं
जिथे शब्दाला मान असावा
जिथे शब्दांचा खेळ नसावा

कुठलं तरी एक नातं असावं
जिथे पूर्ण विश्वास असावा
जिथे कटकारस्थान नसावं

कुठलं तरी एक नातं असावं
जिथे फक्त प्रेमाचं वाटप असावं
जिथे संपत्तीसाठी भांडण नसावं

नातं हे कुठलंही असलं तरी
ते कायम जपण्यासाठी असावं
संकुचित मनाने, गैरसमजाने
कायम तोडण्यासाठी नसावं...

**-दिपक बजरंग नलावडे**

# कोणत्या आव्हानांकडे लक्ष हवे ?

महाविकास आघाडीशी स्पर्धा करताना महायुतीने जनतेला 'भरमसाठ आश्वासने दिली. ती पूर्ण करण्याची जबाबदारी नव्या सरकारवर आहे आणि हेच त्यांच्यापुढील खरे आव्हान आहे.

भरभरून मते देऊन या सरकारला सत्तेवर आणणाऱ्या लाडक्या बहिणींना आता दरमहा दीड हजाराऐवजी २१०० रुपये द्यायचे आहेत. त्याचा लाभ राज्यातील सुमारे दोन कोटी ३९ लाख महिलांना मिळत आहे. पंधराशे रुपयांची मदत देतानाच या सरकारची दमछाक झाली आहे. आता त्यांना पुन्हा जास्तीचे पैसे द्यावे लागणार आहेत. ते द्यायचे मोठे आव्हान या सरकारपुढे आहे. सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटल्याप्रमाणे आता लाडक्या बहिणींना जादा पैशांसाठी दिवाळीची वाट पहावी लागेल. दीड हजार रुपयांची मदत देण्यासाठी ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद करावी लागली. आता वाढीव दहा-बारा हजार कोटी रुपयांची तरतूद करावी लागेल. ही मदत घेणाऱ्या २ कोटी ३९ लाख महिलांच्या संख्येत काही कपात केली जाण्याची शक्यता आहे. या योजनेसाठी उत्पन्नाची मर्यादा आहे. त्याबाबतीत कुठलीही खातरजमा केली गेली नव्हती. आता सरकार उत्पन्नाच्या अटीकडे बोट दाखवून असंख्य महिलांना याचा लाभ देणे थांबवू शकते, याची भीती सगळ्यांनाच आहे. तसे काही केल्यास महिलांची नाराजी निर्माण होण्याची शक्यता आहे. विधानसभेला मतांचे भरभरून दान टाकणाऱ्या महिला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत हात आखडता घेण्याची शक्यता आहे. सरकारचेच काही हस्तक या योजनेच्या विरोधात न्यायालयात जातील आणि न्यायालयातूनच या योजनेला स्थगिती आणली जाईल आणि त्याचे खापर पुन्हा विरोधकांवरच फोडलं जाईल, अशी व्यूहरचनाही सरकारकडूनच केली जाण्याची शक्यता आहे.

प्रचंड खर्चाच्या अन्य अनेक योजनांमध्ये शेतकऱ्यांच्या नियोजित कर्जमाफीचा समावेश आहे. अर्थात ही कर्जमाफी नेमकी किती प्रम ाणात दिली जाईल, हे महायुतीने जाहीर केलेले नाही युतीच्या नेत्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची मोघम घोषणा केली होती. शेतकरी आता त्या प्रतीक्षेत आहेत. शेतकरी सन्मान निधी बारा हजार रुपयांवरून पंधरा हजार रूपये इतका केला जाणार आहे, वृद्धांना मिळणारी पेन्शन आता पंधराशे रुपयांवरून २१०० रुपये इतकी केली जाणार आहे. एवढेच नव्हे, तर दहा लाख विद्यार्थ्यांना दरमहा दहा हजार रुपये विद्यावेतन देण्याची घोषणाही महायुतीने आपल्या जाहीरनाम्यात केली आहे. या महाप्रचंड खर्चाचा बोजा उचलण्याची ताकद या सरकारमध्ये आहे काय, याचा विचार आता करावा



लागेल. आता थातूरमातूर उत्तरं देऊन किंवा शाब्दिक कसरती करून सरकारला या आश्वासनांपासून दूर पळता येणार नाही, इतका मोठा नैतिक दबाव जनतेने मोठा कौल देऊन या सरकारवर टाकला आहे. विधानसभेच्या निवडणुकीअगोदर दोन-तीन महिन्यांमध्ये राज्य सरकारनं मंत्रिमंडळात अनेक निर्णय जाहीर केले. प्रत्येक जातीसाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचीही घोषणा करण्यात आली. त्याचा बोजा वेगळाच आहे.

आता दिवसागणिक सरकारला त्यांच्या आश्वासनांची आणि त्यांनी घेतलेल्या निर्णयांची आठवण करून दिली जाणार आहे. निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयांवरील एकूण खर्च ९३ हजार कोटी रुपये इतका असणार आहे. त्यात निवडणूक जाहीरनाम्यातील आश्वासनपूर्तीच्या खर्चाचा भार पडणार तो वेगळाच. निवडणुकीच्या आधीच सरकारने सुमारे ३६ हजार कोटी रुपयांची देणी थकवली होती. सरकारवर साडेसात लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. महसुली उत्पन्न सव्वा पाच लाख कोटी रुपयांच्या आसपास आहे. अशा बिकट परिस्थितीत हा वाढीव लाखो कोटी रुपयांचा भार उचलताना सरकारची चांगलीच तारांबळ उडणार आहे. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल सहा हजार रुपयांचा हमीभाव देणार असल्याचे सरकारने म्हटले होते. त्याच्या खरेदीसाठी जादा केंद्र सुरू करण्याचे सरकारने मान्य केले आहे. शेतकऱ्यांच्या वीजबील माफीचे आश्वासन आणि भावांतर योजनेची घोषणा सरकार कसे पेलणार, हे ही पहावे लागणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था आणि सहकारी संस्थांच्या निवडणुका सोडल्यास आता पुढील साडेचार ते पाच वर्षे राज्यात कोणत्याही मोठ्या निवडणुका नाहीत. त्यामुळे या योजनांमध्ये चालढकल केल्यास सरकारच्या स्थिरतेवर कोणताही परिणाम होणार नाही असा हिशेब मनाशी बांधून सरकार या योजनांबाबत टोलवाटोलवीची भूमिका घेणार असेल, तर मात्र कमालीचा असंतोष निर्माण होऊ शकतो.

नव्या सरकारसमोर रोजगारनिर्मिती, राज्याचा आर्थिक गाडा सुरळीत चालवणे यासह अनेक आव्हाने असणार आहेत.


राज्यापुढील सामाजिक आव्हानांपैकी सर्वात मोठे आव्हान असेल ते मराठा आरक्षण टिकवण्याचे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना दिलेले दहा टक्के आरक्षण टिकवण्यासाठी नव्या सरकारला जोरदार प्रयत्न करावे लागणार आहेत. कारण या आधीही मराठा आर- क्षणाला आव्हान दिल्यानंतर न्यायालयाने आरक्षणाचा आदेश रद्द केला होता. आरक्षणाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल करण्यात आल्या, म्हणूनच दहा टक्के आरक्षण न्यायालयात टिकवणे हे नव्या सरकारपुढील नवे आव्हान असणार आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सामूहिक उपोषणाचा इशारा दिला आहेच. लोकसभेच्या निवडणुकीनंतर मराठा समाजाच्या मागण्या फारशा गांभीयनि न घ्यायचे सरकारने ठरवलेले दिसते. आता किती काळ दुर्लक्ष करणार आणि तसे केल्यास कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही का, अशी भीती आहे. धनगर समाजाला आदिवासी समाजातून आरक्षण देण्यासाठी आंदोलन सुरू होते. सरकारने समिती नेमून आंदोलन मागे घ्यायला लावले. आता म हायुतीला प्रचंड यश मिळाल्याने धनगर समाजाला आरक्षण कसे मिळवून द्यायचे, असा प्रश्न आहे. आदिवासी समाजाचा धनगर समाजाच्या आरक्षणाला विरोध आहे. आता मराठा आणि धनगर समाज पुन्हा रत्यावर उतरण्याची शक्यता असून, त्याचा परिणाम राज्याच्या समाजस्वास्थ्यावर होऊ शकतो.

गेल्या दहा वर्षांमध्ये महाराष्ट्रावरील कर्जाचा बोजा दुपटीने वाढला असून आठ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. राज्याला येत्या सात वर्षांमध्ये सव्वातीन लाख कोटी रुपयांचे कर्ज फेडायचे असून कर्जफेडीमुळे या काळात सरकारला आर्थिक दबावाला सामोरे जावे लागू शकते, असे 'कॅग'ने आपल्या अहवालात नमूद केले आहे. सरकारचे उत्पन्न आणि तफावत म्हणजेच राजकोषीय तूटही तीन टक्के या स्वीकृत मर्यादेच्या पुढे गेली आहे. राज्यात ठिकठिकाणी १,७८१ कोटी रुपये खर्च करून क्रीडा संकुले बांधण्याच्या प्रस्तावाला तसेच अन्य अनाठायी आश्वासने देण्यालाही अर्थ खात्याने विरोध wi

केला होता. त्यामुळे यापुढे सवंग घोषणा करून चालणार नाही, उलट, आर्थिक शिस्त आणणे हे पहिले आव्हान राहील. त्यासाठी सर्व प्रकारच्या उधळपट्टीला लगाम घालावा लागेल. महाराष्ट्राला २०२८ पर्यंत एक ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी शेती किफायतशीर बनवावी लागेल. निर्मिती क्षेत्र जोमदार बनवण्याचीही गरज आहे. कोणकोणत्या क्षेत्रांमध्ये निर्यात वाढू शकते, याबद्दलच्या शिफारशींची वेगाने अंमलबजावणी होणे जरुरीचे आहे. मागच्या सरकारमधील काही मंत्री भ्रष्टाचाराच्या आरोपांच्या सावटाखाली होते. नव्या सरकारमध्ये स्वच्छ चेहऱ्याचे कार्यक्षम मंत्री असतील आणि त्यात महिलांना पुरेसे प्रतिनिधित्व दिले जाईल, अशी अपेक्षा आहे. बेरोजगारी निर्मूलन, म हागाईला लगाम, शेतकरी प्रश्नांना प्राधान्य आणि महिलांचे सक्षमीकरण या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी नव्या सरकारला काम करावे लागेल.

उस्ताद जाकिर हुसैन को कुल पांच ग्रैमी अवार्ड मिल चुके हैं। साल 1992 में उन्हें मिकी हार्ट द्वारा सह-निर्मित और निर्मित एल्बम प्लैनेट ड्रम को 'सर्वश्रेष्ठ विश्व संगीत एल्बम' के लिए पहला ग्रैमी पुरस्कार मिला। 8 फरवरी 2009 को उन्होंने 'ग्लोबल ड्रम प्रोजेक्ट' के लिए 'समकालीन विश्व संगीत एल्बम श्रेणी' में ग्रैमी जीता। इसमें मिकी हार्ट, सिकिरू अडेपोजू और जियोवानी हिडाल्गो ने सहयोग किया था। वहीं, 4 फरवरी 2024 को जाकिर हुसैन को '66वें वार्षिक ग्रैमी अवार्ड्स में' 3 पुरस्कार मिले। पहला ग्रैमी उन्हें 'पश्तो' के लिए मिला, जिसे अमेरिकी बैंजो वादक बेला फ्लेक, अमेरिकी बेसिस्ट एडगर मेयर और भारतीय बांसुरी वादक राकेश चौरसिया के सहयोग से लिखा और रिकॉर्ड किया गया था। जाकिर हुसैन को दूसरा ग्रैमी 'बेस्ट कंटेम्पररी इंस्ट्रूमेंटल एल्बम' के लिए मिला, जिसे उन्होंने फ्लेक, मेयर और चौरसिया के साथ इक्लेक्टिक क्लासिकल-मीट-जैज एल्बम 'ऐज वी स्पीक' के लिए जीता। तीसरा ग्रैमी उन्हें एल्बम 'दिस मोमेंट' के लिए मिला, जिसमें विश्व-फ्यूजन बैंड शक्ति ने सहयोग किया था।

**11 साल की उम्र में अमेरिका में किया पहला कॉन्सर्ट**

जाकिर हुसैन का जन्म 9 मार्च 1951 को मुंबई में हुआ था। उन्होंने 11 साल की उम्र में अमेरिका में अपना पहला कॉन्सर्ट किया था। यहीं से उन्होंने खुद को कला के क्षेत्र में स्थापित करना शुरू कर दिया। 1973 में उनका पहला एलबम 'लिविंग इन द मैटेरियल वर्ल्ड' आया। इसके बाद उन्होंने अपनी कला और प्रतिभा के दम पर दुनिया भर में नाम कमाया।

# संगीत की दुनिया के लीजेंड्स ने यादगार बना दिया एवरग्रीन म्यूजिक अवॉर्ड सीजन 3 को

## दिखे गायिकी के कई रंग



**मुंबई**

वीएस नेशन मीडिया ग्रुप और ताल म्यूजिक एंड फिल्म्स के संयुक्त तत्वाधान में एवरग्रीन म्यूजिक अवॉर्ड सीजन 3 का सफल आयोजन हुआ। इस संगीत समारोह में संगीत के क्षेत्र में उल्लेखनीय योगदान देने वाले लीजेंड, नामचीन और नवोदित प्रतिभाओं को अवार्ड देकर सम्मानित किया किया जाता है।

यहाँ जानकारी दे दे कि मुम्बई में कई संस्थाओं के द्वारा विविध अवार्ड समारोहों का आयोजन होता रहता है लेकिन संगीत की दुनिया के अनमोल सितारों को व नवोदित उभरती प्रतिभाओं को सम्मान देने का काम एवरग्रीन म्यूजिक अवॉर्ड में ही होता है। आयोजक दविंद्र खन्ना का मानना है कि म्यूजिक हमारा सबसे अच्छा मित्र है, हमारे सुख दुख का साथी है। आप कितने भी उदास निराश क्यूं ना हो संगीत सुनते ही आप सब भूल जाते है, और म्यूजिक ही सदा से एवरग्रीन रहा है और रहेगा। देवेंद्र ने बताया कि इस अवॉर्ड का उद्देश्य जहां नवोदित प्रतिभाओं को प्रकाश में लाना है वहीं पुराने लीजेंडस को भी नई पीढ़ी से रूबरू कराना है। इस बार यहां लीजेंड म्यूजिक मेस्ट्रो स्व. लक्ष्मीकांत जी, लीजेंड म्यूजिशियन किशोर सोढा जी, लीजेंड संगीतकार कामिनी खन्ना जी (गोविन्दा के बहन), लीजेंड गीतकार सुधाकर शर्मा जी, लीजेंड संगीतकार दिलीप सेन जी, लीजेंड मेकअप आर्टिस्ट शेर बहादुर सिंग जी, लीजेंड अरेंजर संगीतकार व शो आयोजक नितिन शंकर जी,को सम्मानित किया गया। इनके साथ मल्टी टैलेंटेड गायिका उज्जयिनी रॉय, गायिका अनुपमा सी.श्रीवास्तव, गायिका पामेला जैन, गायिका राजा लक्ष्मी, गीता बेन यादव, गायक श्रीकांत कुलकर्णी, गायक अरविंदर सिंह, अतुल श्रीवास्तव, गायक चेतन

राणा, विनोद शेषाद्रि, हृदेश शर्मा गीतकार एम प्रकाश को भी सम्मानित किया गया। इसके अलावा म्यूजिशियन प्रदीप पांडे, हरिओम अज़नेरिया, निलेश प्रस्तवार( बॉबी), प्रवीन नंदा की भी सम्मान दिया गया। इनके साथ ही संगीत को प्रमोट करने वाले पत्रकारों को भी सम्मान दिया गया, जिनमें दिनेश गंभावा, वल्लभ भाई राठौड़, गिरिजा शंकर, तेजेंद्र जडेजा, दीपक साहू, आदि अहम रहे। कार्यक्रम में पामेला जैन का गया एक गाना दिल का सौदा भी रिलीज किया गया। इस गाने में मुख्य किरदार निभाने वाले कमल घिमिरे को भी सम्मानित किया गया। इसी गाने पर मॉडल एक्टर्स डांसर कबीना महाराजन ने लाइव परफॉर्मेंस भी दी।

कार्यक्रम के मुख्य अतिथि मध्य प्रदेश के जानेमाने कवि गायक और बिल्डर सोहन सलिल परोहा थे। जो विशेष रूप से इसी कार्यक्रम के लिए जबलपुर से आए थे। इन्होंने आयोजक देवेंद्र खन्ना को दिल से बधाई दी, साथ ही सभी अवॉर्डीज ने देवेंद्र खन्ना बधाई के साथ उनका शुक्रिया अदा भी किया।

यहां हम बता दे कि देवेंद्र खन्ना वसई महाराष्ट्र गौरव अवॉर्ड, नारी शक्ति सम्मान, एवरग्रीन इंडिया ब्यूटी कॉन्टेस्ट, सिंगिंग कॉन्टेस्ट, डांसिंग कॉन्टेस्ट, म्यूजिक कॉन्सर्ट का आयोजन वीएस नेशन (वसई, मुम्बई) के बैनर तले करते रहते है।

# लौह पुरुष: PM मोदी बोले- विकसित भारत का सपना साकार करने में प्रेरक; शाह बोले- आधुनिक भारत की रखी आधारशिला

**नई दिल्ली**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने रविवार को देश के पहले उपप्रधानमंत्री और गृह मंत्री सरदार वल्लभभाई पटेल को उनकी 74वीं पुण्यतिथि पर श्रद्धांजलि दी। उन्होंने कहा कि लौह पुरुष के कार्य विकसित भारत के सपने को साकार करने में प्रेरक सिद्ध होंगे। सोशल मीडिया में पीएम ने लिखा, देश के लौह पुरुष सरदार वल्लभभाई पटेल को उनकी पुण्यतिथि पर शत-शत नमन। उनका व्यक्तित्व और कृतित्व राष्ट्र की एकता, अखंडता और विकसित भारत के संकल्प की सिद्धि के लिए देशवासियों की प्रेरणाशक्ति बना रहेगा।

गृह मंत्री अमित शाह ने राष्ट्र निर्माण में पटेल की भूमिका का उल्लेख करते हुए उन्हें नमन किया। सोशल मीडिया में शाह ने लिखा, सरदार पटेल ने 550 से अधिक रियासतों का एकीकरण कर आधुनिक भारत के निर्माण की आधारशिला रखी। राष्ट्रीय एकता और अखंडता के प्रति उनके समर्पण ने एक भारत-श्रेष्ठ भारत की मजबूत नींव रखी। सरदार साहब का विराट व्यक्तित्व और राष्ट्र निर्माण का संकल्प, राष्ट्रहित को सर्वोपरि रखने वालों के लिए अनंतकाल तक ध्रुव तारे के समान मार्गदर्शक बना रहेगा।

रक्षा मंत्री राजनाथ सिंह ने एक पोस्ट में पटेल को श्रद्धांजलि देते हुए कहा, देश उनके दृष्टिकोण और योगदान को कभी नहीं भूलेगा। वहीं, कांग्रेस नेता प्रियंका गांधी वाड्रा कहा कि वह एक महान स्वतंत्रता सेनानी, आधुनिक भारत के निर्माता और देश की एकता और अखंडता के प्रतीक थे।

# 'कांग्रेस के पास नेता-नीति-नीयत नहीं, राहुल गांधी बताएं इतने साल क्या किया'; सोनोवाल का तीखा हमला

**नई दिल्ली**

केंद्रीय बंदरगाह, जहाजरानी और जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल ने आज यहां कांग्रेस पर तीखा हमला बोला। सोनोवाल ने कहा, कांग्रेस के पास ना तो नीति है, ना उनके पास नेता और ना ही उनके पास देश की भलाई के काम करने की कोई नीयत है। उन्होंने कहा, संसद में संविधान पर चर्चा संदर्भ में कांग्रेस नेता राहुल गांधी पर यह कहते हुए सवाल किया कि वे किसी मुंह से आज संविधान की बात करते हैं। वे एक बार देखें कि कांग्रेस ने संविधान के साथ क्या किया और कितनी बार संशोधन किया। क्या वे भूल गए हैं। उन्होंने कहा, अगर देश के लिए काम करने की नीयत होती तो आज देश कहीं और होता। कांग्रेस के समय में देश में केवल पांच जलमार्ग थे आज हमारे पास 111 जलमार्ग हैं। कहते हैं, जिस देश का अधिकार जल पर है, वही दुनिया पर राज करता है। लेकिन कांग्रेसी सरकारों ने कभी इस ओर ध्यान ही नहीं दिया।

# जयशंकर बोले- हमारी विदेश नीति में आर्थिक कूटनीति पर ज्यादा जोर, चुनौतियों से निपटने के लिए तैयार

**नई दिल्ली**

विदेश मंत्री एस जयशंकर ने रविवार को कहा कि आज भारत एक ऐसा देश बन गया है, जिससे दुनिया को बड़ी उम्मीदे हैं और जिसके पास ज्यादा जिम्मेदारियां हैं। उन्होंने कहा कि भारत को भविष्य में एक ऐसे देश के रूप में देखा जाएगा, जो दुनिया की समस्याओं पर तुरंत प्रतिक्रिया देता है। यह भारत की बढ़ती वैश्विक भूमिका को दर्शाता है। जयशंकर ने कहा कि भारत से उम्मीद की जाएगी कि वह दुनिया की समस्याओं का समाधान निकालने में मदद करे, खासकर हमारे पड़ोसी देशों में। विदेश मंत्री ने कहा, हम जिन भी मुश्किलों का सामना कर रहे हैं, उनका समाधान साझा प्रयासों और फैसलों से होगा। दुनिया बदल रही है। नए विचार आ रहे हैं और भारत को इन बदलावों का हिस्सा बनना होगा। हमें अपनी विदेश नीति को बड़ी सोच और दीर्घकालिक दृष्टि और समझदारी के साथ आगे बढ़ाना होगा।

उन्होंने यह भी कहा कि आपूर्ति श्रृंखलाओं में बदलाव केवल विदेश नीति से नहीं जुड़ा है, बल्कि यह भारत के विकास के लिए एक बड़ा अवसर भी है। उन्होंने कहा, आज हम जो आपूर्ति श्रृखलाओं में बदलाव देख रहे हैं, वह भारत में विनिर्माण को बढ़ावा दे रहे हैं और तकनीकी विकास के लिए भी प्रेरक का काम कर रहे हैं। डिजिटल युग में विदेश नीति के लिए भी नए दृष्टिकोण की जरूरत है, क्योंकि यह युग विनिर्माण के युग से पूरी तरह अलग है। डिजिटल उत्पाद केवल उत्पाद नहीं रह गए, बल्कि वे अब डाटा के स्रोत बन गए हैं। विदेश मंत्री ने कहा कि विदेश नीति एक ऐसा मिश्रण है, जिसमें पुरानी और नई दोनों चुनौतियां शामिल हैं। उन्होंने कहा, हमने कई पुराने मुद्दों का सामना किया है, जिनमें से कई अब भी मौजूद हैं। हमारी सीमा सुरक्षा भी एक गंभीर मुद्दा है और हम अभी भी आतंकवाद के गंभीर रूप से लड़ रहे हैं। इसके साथ ही हमें आज की जरूरतों के अनुसार विदेश नीति को राष्ट्रीय विकास के लिए क्रियान्वित करना पड़ा है। उन्होंने यह भी कहा कि पिछले दस वर्षों में भारत की विदेश नीति में आर्थिक कूटनीति पर ज्यादा जोर दिया गया है। प्रधानमंत्री और विदेश मंत्री जब भी विदेश यात्रा पर जाते हैं, तो उनके एजेंडे में प्रौद्योगिकी, पूंजी, सहयोग, निवेश और सर्वोत्तम प्रथाओं का बड़ा स्थान होता है। यह अब विदेश नीति का एक अहम हिस्सा बन चुका है।

# शेख हसीना ने मुहम्मद यूनुस पर तीखा हमला बोला, कहा- वह एक अलोकतांत्रिक समूह का नेतृत्व कर रहे



**नई दिल्ली**

बांग्लादेश की अपदस्थ प्रधानमंत्री शेख हसीना ने रविवार को अंतरिम सरकार के प्रमुख मुहम्मद यूनुस पर एक और तीखा हमला बोला। हसीना ने यूनुस पर आरोप लगाया कि वह एक 'अलोकतांत्रिक समूह' का नेतृत्व कर रहे हैं, जो लोगों के प्रति कोई जिम्मेदारी नहीं निभा रहा है।

'बिजॉय दिबोश' की पूर्व संध्या पर एक बयान में, अपदस्थ प्रधानमंत्री हसीना ने यूनुस को 'फासीवादी' बताते हुए आरोप लगाया कि उनके नेतृत्व वाली सरकार का मुख्य उद्देश्य मुक्ति संग्राम की भावना और मुक्ति समर्थक ताकतों को दबाना है।

बांग्लादेश 16 दिसंबर को 'विजय दिवस' के रूप में मनाता है। 1971 में तत्कालीन पाकिस्तानी सेना प्रमुख जनरल अमीर अब्दुल्ला खान नियाजी ने 93,000 सैनिकों के साथ 13 दिनों तक युद्ध लड़ा, जिसके बाद भारतीय सेना और बांग्लादेश की 'मुक्ति वाहिनी' की संयुक्त सेना के सामने आत्मसमर्पण कर दिया। इसके बाद पूर्वी पाकिस्तान बांग्लादेश बन गया।

पूर्व पीएम हसीना ने यूनुस को फासीवादी बताते हुए कहा कि उनकी सरकार ने असांविधानिक तरीके से सत्ता पर कब्जा कर लिया है। उन्होंने कहा, 'वे सत्ता अपने हाथ में ले रहे हैं और सभी लोक कल्याण कार्यों में बाधा डाल रहे हैं।' हसीना ने यूनुस सरकार की आलोचना करते हुए कहा कि बांग्लादेश के लोग कीमतों में वृद्धि के बोझ तले दबे हुए हैं।

हसीना ने यह भी कहा कि यूनुस की सरकार स्वतंत्रता संग्राम और बांग्लादेश के इतिहास के प्रति संवेदनशील नहीं है, और उनके कदम इस बात को साबित करते हैं।

**अगस्त में भारत आ गई थीं हसीना**

इससे पहले, हसीना अगस्त में प्रधानमंत्री पद से इस्तीफा देने के बाद भारत आ गई थीं। यूनुस के नेतृत्व में अंतरिम सरकार बनने के बाद भारत और बांग्लादेश के रिश्तों में तनाव बढ़ गया है, खासकर बांग्लादेश में हिंदू समुदाय और अन्य अल्पसंख्यकों पर हमलों के बढ़ने के कारण।

# राजनाथ सिंह: विकसित भारत के लिए सांस्कृतिक पुनर्जागरण जरूरी; रक्षा मंत्री ने स्वामी दयानंद सरस्वती को किया याद

**नई दिल्ली**

रक्षा मंत्री राजनाथ सिंह ने कहा कि हर राजनीतिक और राष्ट्रीय लक्ष्य को हासिल करने के लिए एक सामाजिक और सांस्कृतिक धरातल तैयार करना पड़ता है। इसलिए अगर हमें भारत को विकसित राष्ट्र बनाने का लक्ष्य हासिल करना है तो हमें देश में फिर से सांस्कृतिक पुनर्जागरण का वातावरण तैयार करना होगा।

रक्षा मंत्री रविवार को यहां भारत मंडपम में आर्य समाज के 150वें स्थापना वर्ष के अवसर पर आयोजित कार्यक्रम को संबोधित कर रहे थे। उन्होंने कहा कि आज भारत की आजादी का अमृतकाल चल रहा है। यह संयोग है कि आर्य समाज के संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती की 200वीं जयंती वर्ष मनाया जा रहा है। जिस तरह स्वामीजी ने एक जागरूक सांस्कृतिक भारत की कल्पना की थी, उसी तरह हमारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने विकसित भारत के निर्माण का लक्ष्य रखा है। हमारा मानना है इस लक्ष्य को हासिल करने के लिए हमें सांस्कृतिक जागरूकता का



माहौल बनाने की जरूरत है।

रक्षा मंत्री ने कहा कि गुजरात की धरती पर जब स्वामीजी का जन्म हुआ था तब देश अंग्रेजों की बेड़ियों में जकड़ा हुआ था। अंग्रेजी शासक भारत और भारतीय संस्कृति को दोयम दर्जे का बता कर उसका सार्वजनिक रूप से उपहास उड़ाते थे। स्वामी दयानंद सरस्वती ने भारत की सोई चेतना को जगाने का काम किया।

उन्होंने कहा कि उनका प्रभाव अंग्रेजी शासन से लड़ने वाले लाला लाजपत राय, राम प्रसाद बिस्मिल, स्वामी श्रद्धानंद जैसे कई महापुरुषों पर पड़ा। स्वातंत्र्य वीर सावरकर ने उनकी भूमिका और योगदान के बारे में लिखा है कि स्वामीजी भारतीय स्वतंत्रता संग्राम के पहले योद्धा थे। उन्होंने ही सबसे पहले स्वराज की मांग की थी।

रक्षा मंत्री ने कहा कि स्वामी दयानंद सरस्वती ने ही सबसे पहले स्वराज की मांग की थी। वह केवल वेदों की मीमांसा करने वाले ऋषि मात्र ही नहीं थे, बल्कि वे देश में नई सांस्कृतिक यात्रा के प्रकाश पुंज थे। हमारे वेद, भारतीय ज्ञान विज्ञान की गंगोत्री की तरह है।

बिना उद्गम समझे भारतीय ज्ञान गंगा का विस्तार समझ पाना मुश्किल ही नहीं ना मुमकिन है। इसलिए स्वामीजी ने मूल की तरफ ही सबका ध्यान खींचा। वेदों में ऐसे ज्ञान हैं जिनका सहारा लेकर हम जलवायु परिवर्तन समेत आधुनिक युग की समस्याओं के भी समाधान ढूंढ सकते हैं।

# मुख्य सचिवों का सम्मेलन: राज्यों से PM मोदी की अपील, स्टार्ट-अप्स को बढ़ावा देने के लिए सरकारी नियम सरल बनाएं

**नई दिल्ली**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने रविवार को राज्यों से कहा कि वे ऐसा वातावरण बनाएं जहां स्टार्ट-अप्स आसानी से बढ़ सकें, साथ ही सरकारी नियमों को सरल बनाएं, जो आम नागरिकों के लिए अक्सर कठिन होते हैं। उन्होंने यह बात मुख्य सचिवों के चौथे राष्ट्रीय सम्मेलन में कही। उन्होंने कहा कि राज्यों को शासन के तरीके में सुधार करना चाहिए ताकि नागरिकों की सक्रिय भागीदारी बढ़ सके। उन्होंने यह भी कहा कि सुधार प्रदर्शन और बदलाव पर ध्यान केंद्रित करना महत्वपूर्ण है और लोगों को सरकारी योजनाओं के बारे में जानकारी देना भी जरूरी है।

पीएम मोदी ने कहा कि मोटापा देश के लिए बड़ी चुनौती बन गया है और इसे गंभीरता से लेना चाहिए। उनका मानना था कि एक फिट और स्वस्थ भारत ही 'विकसित भारत' बन सकता है। उन्होंने यह भी कहा कि भारत को 2025 तक तपेदिक (टीबी) मुक्त किया जा सकता है और इस लक्ष्य में आशा और आंगनवाड़ी कार्यकर्ताओं का अहम रोल होगा।

प्रधानमंत्री ने कहा कि भारत की पुरानी




पांडुलिपियां हमारी धरोहर हैं और राज्यों को इन्हें डिजिटल रूप में सुरक्षित रखने के लिए तकनीक का इस्तेमाल करना चाहिए। सम्मेलन में एक महत्वपूर्ण विषय 'उद्यमिता, रोजगार और कौशल का विकास था, खासकर छोटे और मझोले शहरों में स्टार्ट-अप्स को बढ़ावा देने पर।

इसके साथ ही पीएम मोदी ने राज्यों से कहा कि वे छोटे शहरों में ऐसे स्थानों की पहचान करें, जहां उद्यमी बैंकिंग, रसद और अन्य सेवाओं का फायदा उठा सकें। उन्होंने ई-कचरे के पुनर्चक्रण की जरूरत पर भी बात की, क्योंकि डिजिटल समाज बढ़ने से यह समस्या और बड़ी हो सकती है।

पीएम मोदी ने यह भी कहा कि शहरों को आर्थिक विकास का केंद्र बनाने के लिए मानव संसाधन विकास पर काम करना चाहिए, और शहरी शासन, जल प्रबंधन और पर्यावरण के क्षेत्र में विशेषज्ञता वाले संस्थान बनाने पर जोर दिया। उन्होंने यह भी कहा कि बढ़ती शहरीकरण के साथ, हमें शहरी आवास की समस्या पर भी ध्यान देना होगा।

यह सम्मेलन प्रधानमंत्री मोदी के विकसित भारत के दृष्टिकोण को साकार करने की दिशा में एक महत्वपूर्ण कदम था। इसमें यह बात भी सामने आई कि महिलाओं के नेतृत्व में होने वाले विकास से भारतीय अर्थव्यवस्था को प्रोत्साहन मिल सकता है।

कुल मिलाकर देख जाए तो यह सम्मेलन यह दर्शाता है कि भारत को मध्यम आय वाले से उच्च आय वाले देशों में बदलने के लिए उद्यमिता, कौशल और रोजगार के नए अवसरों पर काम करना जरूरी है, और इसके लिए सामूहिक प्रयास की आवश्यकता है।

मराठी अक्रॉस मुंबई

# मशीद बंदर रेल्वे स्थानकाजवळील कर्नाक पुलाच्या लोखंडी तुळईचे 83 टक्के सुटे भाग प्रकल्पस्थळी दाखल



■ मुंबई

मशीद बंदर रेल्वे स्थानकापासून काही अंतरावर असलेला व पी. डि'मेलो मार्गाला जोडणा-या १५४ वर्ष जुन्या कर्नाक पुलाची बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पुनर्बांधणी सुरू आहे. या प्रकल्प अंतर्गत ५१६ मेट्रिक टन वजनाची दक्षिण बाजुची लोखंडी तुळई (गर्डर) रेल्वे भागावर स्थापित करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे. आता, दुस-या बाजुच्या लोखंडी तुळई (गर्डर) चे ४२८ मेट्रिक टन (८३ टक्के) सुटे भाग प्रकल्पस्थळावर दाखल झाले आहेत. तर, उर्वरित सुटे भाग दिनांक २० डिसेंबर २०२४ पर्यंत प्रकल्पस्थळी दाखल होणे अपेक्षित आहे. तुळईच्या सुटे भागांचे जोडकाम, तुळई स्थापित करण्याची कार्यवाही, पोहोचमार्ग (अ‍ॅप्रोच रोड) बांधणी, भार चाचणी (लोड टेस्ट) आदी कामकाजाचे सूक्ष्म नियोजन करत वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार, अपेक्षित कार्यवाही पूर्ण झाल्यास दिनांक ५ जून २०२५ पर्यंत कर्नाक पूल वाहतुकीस खुला करण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे.

दक्षिण मुंबईतील मशीद बंदर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि मोहम्मद अली मार्ग परिसरातील वाहतुकीसाठी कर्नाक पूल महत्त्वाचा आहे. लोकमान्य टिळक मार्गावरील कर्नाक पूल धोकादायक झाल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेने या पुलाच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेतले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या पूल विभागामार्फत पुलाच्या पुनर्बांधणीचे कामकाज वेगाने सुरू आहे.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर म्हणाले की, कर्नाक पुलाच्या दुस-या बाजूच्या लोखंडी तुळई (गर्डर) चे ४२८ मेट्रिक टन (८३ टक्के) सुटे भाग प्रकल्पस्थळावर दाखल झाले आहेत. तर, उर्वरित सुटे भाग दिनांक २० डिसेंबर २०२४ पर्यंत प्रकल्पस्थळी दाखल होणे अपेक्षित आहे. दिनांक १३ जानेवारी २०२५ पर्यंत तुळईच्या सुटे भागांचे जोडकाम करून दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजी 'ट्रायल रन' केले जाईल. दिनांक १८ आणि १९ जानेवारी २०२५ रोजी रेल्वे 'ब्लॉक' मिळण्याबाबत मध्य रेल्वे प्रशासनाकडे विनंती करण्यात आली आहे. उपरोक्त कालावधीत रेल्वे 'ब्लॉक' मिळाल्यानंतर दिनांक १९ जानेवारी २०२५ पर्यंत तुळई स्थापित करण्याची कार्यवाही पूर्ण केली जाईल. त्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून मध्य रेल्वेसोबत समन्वय साधण्यात येत आहे. अधिक माहिती देताना अभिजीत बांगर म्हणाले की, रेल्वे मार्गावर तुळई स्थापित करण्याची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर पुढील कामकाजाचे सूक्ष्म नियोजन करून टप्पेनिहाय किती कालावधी लागेल, याची निश्चिती करण्यात आली आहे. त्यानुसार, पूर्व आणि पश्चिम दिशेच्या पोहोचमार्ग (अ‍ॅप्रोच रोड) साठी खांब बांधणीचा (पाईल फौंडेशन) पहिला टप्पा दिनांक १५ मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करणे, दिनांक १७ एप्रिल २०२५ पर्यंत खांब उभारणी पूर्ण करणे, दिनांक ३ मे २०२५ पर्यंत पोहोच रस्त्यांचे काँक्रिटीकरण आणि दिनांक १ जून २०२५ रोजी भार चाचणी (लोड टेस्ट) करण्याचे नियोजन आहे. या नियोजित वेळापत्रकानुसार, अपेक्षित कार्यवाही पूर्ण झाल्यास दिनांक ५ जून २०२५ पर्यंत कर्नाक पूल वाहतुकीस खुला करण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे. मात्र, त्यासाठी दिनांक १८ आणि १९ जानेवारी २०२५ रोजी मध्य रेल्वे प्रशासनाने 'ब्लॉक' मंजूर करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यादृष्टीने मध्य रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला जात आहे. पुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर जसे की, अ‍ॅण्टी क्रॅश बॅरिअर्स, वीजेचे खांब उभारण्याकामी होणारा कालापव्यय टाळण्यासाठी ही कामे समांतरपणे पूर्ण केली जाणार असल्याचे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी नमूद केले.

# राज्यात जखमी वन्य प्राण्यांसाठी निवारा केंद्र उभारणार

## सरकारकडून 8 कोटी 64 लाखांच्या निधीची तरतूद

■ मुंबई

राज्य शासनाने जखमी वन्य प्राण्यांसाठी अंपगालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. याच धर्तीवर आता मुंबई, ठाणे, पुणे, कोल्हापूर, अहमदनगर, गडचिरोली येथे वन्यप्राण्यांसाठी निवारा केंद्र उभारली जाणार आहेत. सुमारे ८ कोटी ६४ लाख रुपयांचा निधी यासाठी वितरित केल्याचा शासन आदेश महसूल व वन विभागाने गुरुवारी जारी केला.

जखमी वन्यप्राण्यांच्या उपचारासाठी राज्यात उपचार केंद्र नाहीत. परिणामी अनेक वन्यजीव दगावल्याच्या घटना समोर आल्या आहेत. राज्य शासनाने याची गंभीर दखल घेत, महत्वाच्या भागांत वन्य प्राण्यांसाठी अंपगालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. आता निवारा केंद्र उभारले जाणार आहेत. सुमारे ८ कोटी ६४ लाख ३४ हजार रूपयांच्या निधीची तरतूद केली आहे. अटी व शर्तीवर हा निधी वितरित केला जाईल. अपंगालयासोबत निवारे उभारताना, राष्ट्रीय प्राणी संग्रहालयाच्या मार्गदर्शक तत्वांचा भंग होणार नाही. तसेच वित्तीय अनियमितता होणार नाही, याची खबरदारी विभाग स्तरावर घेण्याच्या सूचना महसूल व वन विभागाने दिल्या आहेत.

राज्य सरकारने अर्थसंकल्पात वन्य प्राण्यांसाठी अपंगालय उभारणार असल्याची घोषणा केली होती. त्यानुसार अपंगालयाकरिता जागा निश्चित केल्या होत्या. तसेच निधीची तरतूद केली होती. या निधीपैकी कोल्हापूर सह्याद्री व्याघ्र प्रकल्पासाठी २ कोटी, नागपूरमधील उपवन संरक्षण (प्रा.) ५१ लाख, अहमदनगर उपवन संरक्षण (प्रा.) करिता ५ लाख, गडचिरोली उपवन संरक्षणाकरिता (प्रा.) ८ लाख ८० हजार, ठाणेमधील उपवन संरक्षण (प्रा.) ६० लाख, मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानकरिता १ कोटी ९५ लाख ५० हजार, जुन्नर वनपरिक्षेत्रातील जुन्नर, माणिकडोह बिबट निवारा केंद्र विस्तारीकरणासाठी पिंजरे ३ कोटी ४३ लाख २१ हजार रुपये वितरीत करण्यात आले आहेत.

# मी आईच्या शब्दासाठी पदयात्रा करतोय...

■ मालेगाव

मालेगाव जवळच्या "गिल पंजाब हॉटेल" चे मालक लकी आबा गिल यांना आज रस्त्याच्या कडेने एक वयस्कर जोडपं पायी जातांना दिसलं. भिकारी दिसणाऱ्या जोडप्याला, दुपार असल्यामुळं, त्यांनी सहजच जेवणाचं विचारलं तर ते नको म्हणाले म्हणून त्यांना १०० रुपये देऊ केले तर ते सुद्धा नको म्हणाले. मग पुढचा प्रश्न विचारला की तुम्ही असे का हिंडताय? त्यानंतर सुरू झाला त्यांचा जीवनपट - ते २२०० किलोमीटरचा प्रवास करून आता द्वारकेला स्वतःच्या घरी चालले होते. त्यांनी सांगितले की, "माझे दोन्ही डोळे १ वर्षांपूर्वी गेले होते आणि डॉक्टरांनी सांगितले की ऑपरेशन करून उपयोग नाही. मग माझ्या आईने डॉक्टरना भेटून ऑपरेशन करायला भाग पाडले व तिने श्रीकृष्ण मंदिरात जाऊन देवाजवळ नवस केला की डोळे परत आले तर माझा मुलगा पदयात्रा करत बालाजी व पंढरपूरला जाऊन परत द्वारकेला पायी येईल. म्हणून मी आईच्या शब्दासाठी पदयात्रा करतोय."



मग मी त्यांच्या बायकोविषयी विचारलं तर, "ती पण मला एकटं सोडायला तयार नव्हती व रस्त्याने मी तुम्हाला जेवण तयार करायला येते म्हणून निघाली." ते २५% हिन्दी व ७५% इंग्रजी बोलत असल्यामुळे त्यांचेशिक्षण विचारलं तर उत्तर ऐकून सुन्न झालो. त्यांनी लंडन येथे ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी मध्ये ७ वर्षे खगोलशास्त्र विषयात पीएचडी केलीय तर त्यांच्या बायकोने मनोविकार शास्त्र या विषयावर लंडन येथेच पीएचडी केलीय. (एवढं शिकून सुद्धा त्यांच्या चेहऱ्यावर गर्वाचा लवलेशही नव्हता. नाहीतर आपल्या कडे १० वी नापास सुद्धा छाती ताणून हिंडतो.) एवढंच नाही तर त्यांनी सी.रंगराजन (गव्हर्नर) व कल्पना चावला यांच्याबरोबर काम केलं होतं व त्यांच्याशी मैत्रीचे संबंध होते.

त्यांना मिळणारे मासिक पेन्शन ते एका अंधांसाठी काम करणाऱ्या ट्रस्टला देऊन टाकतात. सध्या ते सोशल मेडियापासून लांब राहतात. रस्त्याच्या कडेने जाणारं प्रत्येक जोडपं भिकारी असतंच असं नाही. एखाद जोडपं हे आपल्या आईच्या शब्दासाठी प्रभू राम व्हायला तयार होतं. आणि आपल्या पतीसोबत कोणी सीता सुद्धा होतं. म्हणूनच मी आज भेटलेली माणसं ही कलीयुगातील राम-सीताच समजतो.

आम्ही जवळजवळ १ तास गप्पा मारल्या. रस्त्यात उभं राहूनंच. इतके प्रगल्भ विचार ऐकून मन सुन्न झालं. अहंकार गळून गेला आणि वाटलं की आपण उगाचंच खोट्या फुशारकीवर जगतो. त्या व्यक्तीच्या बोलण्यातील सहजपणा बघून असं वाटलं की आपण या जगात शून्य आहोत. त्यांचा पायी प्रवास बघून थक्क झालो. प्रवासाला निघून ३ महिने झाले होते आणि घरी पोहचायला अजून १ महिना लागेल.

त्यांचे नाव डॉ. देव उपाध्याय आणि डॉ. सरोज उपाध्याय.

# विधानसभा विरोधी पक्षनेतासाठी ठाकरे गटाचा आग्रह

■ मुंबई

भविष्यात विधानसभेत विरोधी पक्षनेतेपदासाठी ऊबाठा गटाने दावा केला तर काँग्रेसतर्फे विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेतेपदावर दावा केला जाणार आहे. तशा हालचाली काँग्रेस नेत्यांनी सुरू केल्या असून या संबंधीचा तोंडी प्रस्तावही ठाकरे गटाकडे देण्यात आल्याची माहिती काँग्रेसमधील सूत्रांनी दिली आहे.

मागील सरकारमध्ये विधानसभेचे विरोधी पक्ष नेते पद काँग्रेस कडे होते. काँग्रेसचे नेते विजय वड्डेटीवार यांनी विरोधी पक्षनेता पद भूषवले होते. तर विधान परिषदेमध्ये उबाठा गटाचे अंबादास दानवे विरोधी पक्षनेता म्हणून काम पाहत होते. परंतु आत्ताच झालेल्या निवडणुकीच्या निकालानंतर महाविकास आघाडीतील कोणत्याच एका पक्षाला विरोधी पक्ष नेतापद संख्येअभावी मिळू शकत नाही.२८८ विधानसभा सदस्यांच्या किमान दहा टक्के जागा असाव्या लागतात. म्हणजेच किमान २९ आमदार एकाच पक्षाचे असले पाहिजेत.

विधान परिषदेत अजूनही विरोधी पक्ष नेते म्हणून अंबादास दानवे धुरा सांभाळून आहेत.तेव्हाच्या संख्याबळाच्या जोरावर ठाकरे गटाने हे विरोधी पक्ष नेतापद आपल्याकडे ठेवले होते. परंतु सत्ता परिवर्तनानंतर शिंदेंबरोबर नंतरच्या काळात गेलेल्या विधान परिषद सदस्यांमुळे ठाकरे गटाची संख्या कमी झाली आहे.

### विधान परिषदेत कोणाचे किती संख्याबळ

विधानपरिषदेत ऊबाठा गटाचे सात व काँग्रेसचे सात सदस्य आहेत. शरद पवार गटाचे पाच सदस्य आहेत.

काँग्रेस व ठाकरेंचे संख्याबळ समान असल्यामुळे काँग्रेसने परिषदेवर आपला दावा सादर करणार आहे. असे करून काँग्रेस ठाकरे गटाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करीत आहे.

### निर्णय विधानसभा अध्यक्ष तसेच उपसभापती घेणार

संसदीय राजकारणात विरोधी पक्षनेता पदाला काही संविधानिक अधिकार देखील प्राप्त झाले आहेत. हे पद ज्या पक्षाला मिळते त्या पक्षाला विधिमंडळात वेगळे कार्यालय तसेच स्टाफ देखील मिळतो ज्या आधारे ते राज्यातील वेगवेगळ्या विभागांमध्ये होणाऱ्या घोटाळ्यांची थेट माहिती देखील मागवतात. त्याचा अप्रत्यक्ष फायदा देखील त्या पक्षाला होत असतो. यामुळेच काँग्रेस विधानसभा आणि विधान परिषद दोन्ही ठिकाणी ठाकरे गटाला विरोधी पक्षनेता पद देण्यास इच्छुक नाही. या कारणामुळे महाविकास आघाडीमध्ये आपापसात मोठी फूट देखील पहावयास मिळते. असे असले तरी येणाऱ्या अधिवेशनामध्ये याचा निर्णय शेवटी विधानसभा अध्यक्ष तसेच विधान परिषदेच्या उपसभापती घेणार आहेत.

## संक्षिप्त

# महापुरुषांवरील पुस्तके मिळणार आता 85 टक्के सवलतीत !

■ मुंबई

बार्टीचे महासंचालक सुनील वारे आणि निबंधक इंदिरा अस्वार यांच्या संकल्पनेतून अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेने (आर्टी) महापुरुषांवरील पुस्तकांवर ८५ टक्के सवलत देण्याचा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. "भारताचे संविधान, शुद्र पूर्वी कोण होते?, बुद्ध आणि त्यांचा धम्म, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र (चांगदेव खैरमोडे लिखित भाग १ ते १२), समग्र आंबेडकर चरित्र (बो. सी. कांबळे लिखित भाग १ ते २४), फकीरा (मराठी व इंग्रजी अनुवाद), अण्णाभाऊंची दर्दभरी दास्तान, राजर्षी शाहू रयतेच्या राज्याचे चित्रमय चरित्र, साहित्यसम्राट, स्वराज्य ते स्वातंत्र्य आणि समता, कर्तृत्व आणि व्यक्तिमत्त्व' ही पुस्तके सवलतीत उपलब्ध होणार आहेत. त्यातील भारताचे संविधान, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, अण्णाभाऊ साठे यांचे खंड आणि त्यांच्यावर लिहिलेली मराठी, इंग्रजी पुस्तके आर्टीच्या गोवंडी येथील कार्यालयात ठेवण्यात आली आहेत.

# माजी नौदल कर्मचाऱ्यांसाठी 'संपर्क 4.0'

■ मुंबई

नौदल आपल्या माजी अधिकारी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्याबाबत सतत जागरूक असतो. त्याअनुषंगाने आता निवृत्त अधिकारी, कर्मचारी, वीरमाता, वीरपत्नी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्याबाबत आढावा घेण्यासाठी नौदलाकडून आता 'संपर्क ४.०' हा उपक्रम राबवण्यात येत आहे. याअंतर्गत १६ ते २३ डिसेंबरदरम्यान राज्यातील ७ जिल्ह्यांमध्ये माजी अधिकाऱ्यांसोबत संवाद सत्र आयोजित करण्यात येणार आहे. त्यानुसार १६ ते २३ डिसेंबरदरम्यान अनुक्रमे ठाणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, सोलापूर, कोल्हापूर येथे एकेक दिवस आणि पुण्यात २३ डिसेंबर रोजी हा उपक्रम राबवला जाईल. या कालावधीत १ अधिकारी आणि ५ खलाशांचा समावेश असलेले पथक सर्व जिल्ह्यांतील ईसीएचएस पॉलिक्लिनिकमध्ये भेट देईल. यावेळी अधिकारी, कर्मचारी आणि कुटुंबीयांच्या आरोग्याबाबत आढावा घेऊन त्याबाबत समुपदेशन केले जाईल. माजी नौदल अधिकारी, कर्मचारी आणि कुटुंबीयांना मिळणाऱ्या विविध आरोग्य सेवा, हक्क आणि प्रक्रियांबद्दल माहिती देणे यावर त्यात भर दिला जाणार आहे.

# जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये 'घरोघरी कलाकृती' प्रदर्शन

■ मुंबई

कला गुरू दत्ता परुळेकर यांच्या शिष्यांनी स्थापन केलेल्या 'आर्ट बँड' या संस्थेतर्फे दि. १७ ते २३ डिसेंबर दरम्यान जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये 'घरोघरी कलाकृती' प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. 'आर्टबँड'च्या वतीने अपंग, गतिमंद विद्यार्थी तसेच दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची कलाविषयक कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. समाजोपयोगी उपक्रमांसाठी निधी उभारण्याच्या दृष्टीने कलाप्रदर्शन, प्रात्यक्षिकेही राबवण्यात आले आहेत. 'घरोघरी कलाकृती'तूनही त्याच समाजोपयोगी कामाला हातभार लावण्याचा संस्थेचा हेतू आहे.

# वॉर्डस्तरीय विज्ञान प्रदर्शन

■ मुंबई

विनोद शुक्ला ज्युनिअर कॉलेज चेंबूर येथे ५२ वे वॉर्डस्तरीय विज्ञान प्रदर्शन १६ ते १८ डिसेंबर या कालावधीत पार पडणार आहे. बीएआरसीचे शास्त्रज्ञ विकास दिवाण यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विभाग शिक्षण उपसंचालक संदीप संगवे, सती अनुसया सोसायटीचे सचिव अवद नारायण शुक्ला, उत्तर विभाग शिक्षण निरीक्षक मुस्ताक शेख यांची उपस्थिती असणार आहे. 'शाश्वत भविष्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान' या मुख्य विषयांतर्गत एम पश्चिम वॉर्डमधून सर्व शाळांचे विद्यार्थी प्रकल्प सादर करणार आहेत. विज्ञान प्रदर्शनात शाळांनी सहभाग घेऊन प्रकल्प सादर करावेत. विद्यार्थी, विज्ञानप्रेमी, पालक, शिक्षक यांनी प्रदर्शन पाहण्यास भेट द्यावी, असे आवाहन शिक्षण उपनिरीक्षक भक्ती गोरे व मुख्य निमंत्रक गीतांजली सालियन यांनी केले आहे. विद्यार्थ्यांनी विज्ञान व तंत्रज्ञानाची कास धरावी, असे आवाहन मुख्याध्यापक संघटनेचे सचिव राजन महाडेश्वर यांनी केले आहे.

# शरद पवार गटाची 4 व 5 जानेवारीला बैठक

■ मुंबई

विधानसभा निवडणुकीत केवळ दहा मतदारसंघांत विजय मिळाल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आतापासूनच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी करण्याचे ठरवले आहे. त्यादृष्टीने पक्षाने ४ आणि ५ जानेवारी रोजी मुंबईत बैठक बोलावली आहे. राज्यातील २४ महापालिका, २७ जिल्हा परिषद, ३०० ते ३५० नगर परिषद आणि पंचायत समित्यांवर तीन वर्षांपासून प्रशासक नेमण्यात आला आहे. यामुळे येथील निवडणुका लवकर घेण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सूतोवाच केले आहे. या निवडणुकीत पूर्ण ताकदीनिशी उतरण्याची तयारी शरद पवार गटाने केली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या बैठकीला ज्येष्ठ नेते, खासदार, आमदार, पराभूत उमेदवार, जिल्हाध्यक्ष यांना निमंत्रित केले जाणार आहे.

# मेट्रो 9 च्या कंत्राटदाराला एमएमआरडीएने ठोठावला 40 लाखांचा दंड

■ मुंबई

मेट्रो ९ मार्गिकच्या कंत्राटदाराला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) ४० लाखांचा दंड ठोठावला आहे. यापैकी १० लाख दंड सल्लागाराकडून तर ३० लाख दंड कंत्राटदाराकडून आकारण्यात येणार आहे. मेट्रो ९ मार्गिका दहिसर ते मिरा-भाईंदर दरम्यान उभारली जात आहे. मेट्रो मार्गिकेचे खांब उभारण्यासाठी खणण्यात आलेल्या खड्ड्यामुळे भोवतालच्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीचे कामही कंत्राटदारामार्फत केले जात आहे. याच कामादरम्यान ४ डिसेंबरला सिमेंट मिक्सर वळवताना झालेल्या अपघातात २५ वर्षीय चालकाचा मृत्यू झाला. चालकाला गाडी मागे घेताना रस्त्याचा अंदाज न आल्याने अपघात झाल्याचे सांगितले जाते; मात्र मेट्रो मार्गिकांची उभारणी करताना शून्य अपघात हे एमएमआरडीएचे धोरण आहे. त्यामुळे या अपघातासाठी कंत्राटदाराला ३० लाख रुपये आणि सल्लागाराला १० लाख रुपये दंड ठोठावण्यात आला आहे.

# वाढीव वीज बिल, स्मार्ट मीटर विरोधात ठाकरे गट आक्रमक

## अदानी वीज कंपनी कार्यालयाला दिले निवेदन

■ मुंबई

स्मार्ट मीटरच्या माध्यमातून अव्वाच्या सव्वा वीज बिल आकारणाऱ्या अदानी वीज कंपनी विरोधात ठाकरे गटाने गुरुवारी आक्रमक भूमिका घेत अंधेरी पूर्वेकडील संबंधित कंपनी कार्यालयावर अनिल परब यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने धडक दिली. दरम्यान नागरिकांच्या प्रश्नांचे निरसन होणार नाही, तोपर्यंत स्मार्ट मीटर बसवू नका, अशी जोरदार मागणी केली. दरम्यान, अदानी वीज कंपनी सेनेची मागणी मान्य करताना, स्मार्ट मीटर बसविण्यापूर्वी विचार विनिमय केला जाईल, असे आश्वासन शिष्टमंडळाला दिल्याचे परब यांनी सांगितले.

अदानी वीज कंपनीची दिवसेंदिवस दादागिरी वाढत आहे. मुदतीच्या शेवटच्या दिवशी वीज बिल न भरल्यास थेट विद्युत प्रवाह खंडित करण्याचे प्रकार सुरू आहेत. यापूर्वी वीज मीटर तपासणी विद्यूत महामंडळाचा किंवा संबंधित कंपनीचा व्यक्ती येत होता. मीटरमधील तांत्रिक त्रुटी, अडचणी त्यावेळी कळत होत्या. आता स्मार्ट मीटर बसवून सर्वसामान्य जनतेचा खिसा कापला जातो आहे. भविष्यात अधिक भूर्दंड सोसावा लागणार आहे. परंतु, मुंबईतील वीज ग्राहकांची ही लूट थांबविण्याची जबाबदारी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने शिवसेनेने (ठाकरे) घेतली आहे. त्यानुसार सेनेच्या शिष्टमंडळाने अदानी वीज कंपनीला स्मार्ट मीटर, वाढीव वीज बिल संदर्भात निवेदन वजा इशारा दिला. शिवसेनेचा हा मोर्चा किंवा आंदोलन नव्हते. मात्र, स्मार्ट मीटरबाबत जनतेला सुस्पष्टता येत नाही, तोपर्यंत स्मार्ट मीटर बसविण्याचे काम थांबवावे, अशी मागणी निवदनाद्वारे केली. संबंधितांनी देखील आमची मान्य करत, तसे लेखी उत्तर दिले आहे, असे परब म्हणाले.

तसेच राज्यातील शेतकऱ्यांप्रमाणेच मुंबईतील नागरिक कष्टकरी आहे. शेतकऱ्यांना कृषी वीज पंपासाठी विशेष सवलत दिली जाते, त्याच धर्तीवर कष्टकरी मुंबईकरांचा वीज बिलाबाबत विचार व्हायला हवा. रिलायन्स, बीएसएनएल यांनी सामंजस्य भूमिका वारंवार घेतली होती. शिवसेनेच्या शाखा प्रमुखांचे म्हणणे एकले जात होते. मात्र, अदानी वीज कंपनींकडून स्मार्ट मीटरच्या माध्यमातून कार्यालयात बसून थेट वीज प्रवाह खंडित करत आहे. अदानी मालक असल्याने कंपनी मनमानी कारभार करत आहे. मुंबईच्या हितासाठी शिवसेना (ठाकरे) कार्यरत आहेत. मग अदानी असो किंवा कोणीही, त्यांची दपडशाही मोडीत काढण्याचे काम शिवसेना योग्य प्रकारे करेल, असा इशारा परब यांनी दिला

# ...तर सामान्यांना कायदा हातात घेऊ द्या

## अनधिकृत फेरीवाल्यांच्या मुद्द्यावरून उच्च न्यायालयाची राज्य सरकारला चपराक

■ मुंबई

अनधिकृत फेरीवाल्यांना हटविण्यास राज्य सरकार अपयशी ठरत असल्याने हायकोर्टाने नाराजी व्यक्त केली. सरकार कायद्याची अंमलबजावणी करणार नसेल तर सामान्यांना कायदा हातात घेऊ द्या, आम्ही काही करणार नाही, असे न्यायालयाने सरकारला सुनावले.

उच्च न्यायालयाने निर्देश देऊनही फोर्ट परिसरातील फेरीवाल हटत नसल्याने नागरिकांना चालण्यासही जागा नसल्याची तक्रार याचिकाकर्ते बॉम्बे बार असोसिएशनने न्यायालयात केली. मुंबईत शपथविधीला सर्व व्हीआयपी लोक आले होते. त्यावेळी याच रस्त्यांवर एकही फेरीवाला दिसत नव्हता. आता पुन्हा फेरीवाल्यांनी फुटपाथ आणि रस्ते व्यापलेले आहेत,



असे बार असोसिएशनतर्फे ज्येष्ठ वकील जनक द्वारकदास यांनी न्या. अजय गडकरी व न्या. कमल खाटा यांच्या खंडपीठाला सांगितले.

संबंधित फेरीवाले परवानाधारक आहेत. पोलिस अनधिकृत फेरीवाल्यांसह अधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करत आहेत. त्यामुळे त्यांच्या मूलभूत अधिकारावर गदा येते. टाऊन वेंडिंग कमिटीबाबत मुंबई महापालिकेला लवकर निर्णय घेण्याचे निर्देश द्यावेत, असा युक्तिवाद अधिकृत फेरीवाल्यांतर्फे ज्येष्ठ वकील मिहीर देसाई आणि गायत्री सिंह यांनी केला. फेरीवाल्यांच्या परवान्यांची मुदत संपली आहे. इथे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर गदा आली आहे. फुटपाथवर चालण्याच्या त्यांच्या अधिकारावर गदा आली आहे, असे न्यायालयाने म्हटले. तसेच फोर्ट परिसरात पोलिस चौकी असूनही पोलिस अनधिकृत फेरीवाल्यांकडे डोळेझाक करत असल्याने न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. 'पोलिसांच्या समोर अनधिकृत फेरीवाले बसले असताना ते कारवाई का करत नाही? जर सरकारला कायद्याची अंमलबजावणी करायची नसेल तर त्यांनी तसे स्पष्ट सांगावे. आम्हीही काही करणार नाही. कारण आम्ही कायद्याची अंमलबजावणी करू शकत नाही. ती यंत्रणा तुमच्याकडे आहे. सामान्य नागरिकांना कायदा हातात घेऊन मनमानी कारभार करू द्या," असे न्यायालय म्हणाले.

# बांगलादेशी घुसखोरांना देशाबाहेर हाकला

## राहुल शेवाळे यांची केंद्रीय गृहमंत्र्यांकडे मागणी

■ मुंबई

देशाची सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी तातडीने कारवाई करून बांगलादेशी घुसखोरांना देशाबाहेर काढावे, अशी मागणी शिंदेसेनेचे माजी खासदार राहुल शेवाळे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे केली आहे. देशभरातील पोलिसांना यासाठी विशेष शोध मोहीम राबवण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती शेवाळे यांनी पत्राद्वारे केली आहे. केंद्रीय गृहमंत्र्यांना दिलेल्या पत्रात शेवाळे यांनी म्हटले आहे की, बांगलादेशी घुसखोरीच्या वाढलेल्या घटना या दुर्दैवी असून भिवंडीसारख्या परिसरातून या घुसखोरांची शासकीय कागदपत्रे तयार केली जातात. यामुळे देशाच्या सुरक्षिततेला मोठा धोका असून पायाभूत सुविधांवर देखील मोठा ताण पडत आहे. या पार्श्वभूमीवर देशभरातील सर्व पोलिस स्थानकांना विशेष मोहीम सुरू करण्याचे आदेश द्यावेत. अनधिकृत बांगलादेशी नागरिक आणि त्यांना शासकीय कागदपत्रे मिळवून देणाऱ्या संबंधितांवर तातडीने कठोर कारवाई करावी.

# कांदिवली पश्चिमेला नवा उन्नत डेक, सरकता जिना झाला सुरु

■ मुंबई

पश्चिम रेल्वेवरील कांदिवली स्थानकाच्या पश्चिमेला १०.४ मीटर रुंदीचा आणि ४५ मीटर लांबीचा उन्नत डेक सुरू केला आहे. हा डेक सरकत्या जिन्यांच्या साहाय्याने प्लॅटफॉर्म क्रमांक एकसोबत जोडण्यात आला आहे. त्याचबरोबर ४० मीटर लांबीचा आणि १० मीटर रुंदीचा नवीन दक्षिण बाजूचा पादचारी पूलसुद्धा पूर्ण झाला असून, तोही प्रवाशांसाठी खुला करण्यात आला आहे. या पादचारी पुलाला प्लॅटफॉर्म क्रमांक १, २, ३ आणि ४ यांना जोडणाऱ्या तीन पायऱ्या आहेत. यामुळे प्रवाशांना आरामात प्लॅटफॉर्मपर्यंत पोहोचता येणार आहे.

मुंबई रेल्वे विकास कॉपरिशनच्या (एमआरव्हीसी) माध्यमातून वा डेकची उभारणी केली आहे. २०२३ मध्ये कांदिवली स्थानकात ५५ कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पाची सुरुवात केली. कामे पूर्ण होतील त्याप्रमाणे सुविधा उपलब्ध करण्यात येत असल्याचे एमआरव्हीसीचे मुख्य जनसंपर्क अधिकारी सुनील उदासी यांनी संगितले.

कांदिवली स्थानकामध्ये सुरु असलेल्या दक्षिण आणि उत्तर पादचारी पुलासोबत जोडणारा २६३ मीटर लांबीचा डेक, ८४ मीटर लांबीचा उत्तर पादचारी पूल, ४२ मीटर लांबीचा मधला पाटचारी पूल, तीन लिफ्ट आणि चार एस्केलेटर यांचा समावेश आहे.

पश्चिमेकडील नवीन स्थानकाची इमारत, प्लॅटफॉर्म क्रमांक एकचे रुंदीकरण आणि उत्तर बाजूला टॉयलेट ब्लॉक बांधणे अशी कामे आहेत. या कामांसोबत प्लॅटफॉर्म २/३ आणि ४ वरील नवीन दक्षिण पाटचारी पुलाला विद्यमान पादचारी पुलासोबत जोडण्यासाठी चार मीटर-रुंद स्कायवॉकचे बांधकामही सुरु आहे.

# 137 कोटींच्या फसवणूकप्रकरणी 'ईडी'ची देशभरात कारवाई

■ मुंबई

सक्तवसुली संचालनालयाने (ईडीने) मुंबई, दिल्ली आणि गुरगावमधील १९ ठिकाणी छापे टाकले, अशी माहिती गुरुवारी दिली. सुमाया-डेंट्स प्रकरणातील ही कारवाई करण्यात आली असून त्यात ४६ लाख भारतीय चलन, चार लाख विदेशी चलन व तीन कोटी ४० लाख रुपयांचे सोन्याचे लगड जप्त करण्यात आले. मालमत्तांची कागदपत्रे, डिजिटल उपकरणे हेही जप्त करण्यात आल्याचे ईडीकडून सांगण्यात आले. वरळी पोलीस ठाण्यात मे. डेंट्सू कम्युनिकेशन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, मे. सुमाया इंडस्ट्रीज लिमिटेड आणि त्याचे प्रवर्तक यांच्याविरोधात दाखल गुन्ह्यांच्या आधारावर ईडी याप्रकरणी तपास करत आहेत. त्यांच्यावर १३७ कोटी रुपयांचा फसवणुकीचा आरोप आहे. मंगळवारी हे छापे टाकण्यात आल्याचे ईडीकडून सांगण्यात आले. शोधमोहिमेत कागदोपत्री पाच हजार कोटींचे व्यवहार दाखवण्यात आले. त्यातील १० टक्के व्यवहारच खरे आहेत. पत वाढवण्यासाठी हे व्यवहार दाखवण्यात आले. त्यामुळे समभागांच्या किमतीत वाढ झाली, असे ईडीकडून सांगण्यात आले. त्यामुळे सुमाया कंपनीची उलाढाल २१० कोटीवरून दोन वर्षांतच ६७०० कोटी रुपयांवर पोहचली. त्यामुळे समभागाची किंमत १९ रुपयांवरून ७३६ वर पोहोचले होते. आर्थिक वर्ष २०१९-२० ते २०२१- २२ या कालावधीत हा प्रकार घडला होता, अशी माहिती ईडीकडून देण्यात आली.

# म्हाडाचा ठाण्यात सात मजली वृद्धाश्रम

■ मुंबई

म्हाडाने 'मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) ग्रोथ हब' अंतर्गत मुंबई आणि एमएमआरमध्ये वृद्धाश्रम, तसेच नोकरदार महिलांसाठी वसतीगृह बांधण्याचा निर्णय घेतला आहे. म्हाडा एमएमआरमधील पहिला वृद्धाश्रम आणि नोकरदार महिलांसाठी वसतीगृह ठाण्यात बांधणार आहे. ठाण्यातील माजीवाडा येथील एक जागा यासाठी निश्चित करण्यात आली असून एकाच भूखंडावर बाजूबाजूला वृद्धाश्रम आणि वसतीगृह बांधण्यात येणार आहे.

'एमएमआर ग्रोथ हबम' ध्ये आठ लाख घरांची निर्मिती करण्यासाठी म्हाडाने सविस्तर आराखडा तयार केला आहे.

या आराखड्यानुसार सर्वसामान्यांसाठी परवडणारी घरे बांधतानाच समाजातील इतर घटकांना हक्काचा निवारा उपलब्ध करण्याची एक वेगळी संकल्पना म्हाडाने पुढे आणली आहे. त्यानुसार निराधार वृद्धांसाठी वृद्धाश्रम, तसेच नोकरदार महिलांना सुरक्षित निवारा उपलब्ध करण्यासाठी वसतीगृह बांधण्यात येणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून मुंबई मंडळ मुंबईत तीन वृद्धाश्रम आणि नोकरदार महिलांसाठी सात वसतिगृहे बांधणार आहे.

तर, कोकण मंडळ मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) दोन वृद्धाश्रम आणि नोकरदार महिलांसाठी सहा वसतिगृहे बांधणार आहे.

यासंबंधीचा निर्णय झाल्यानंतर कोकण मंडळाने पहिल्या वृद्धाश्रमासह वसतीगृहासाठी जागा निश्चित केल्याची माहिती मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. ठाण्यातील माजीवाडा येथे एमएमआरमधील पहिले वृद्धाश्रम आणि नोकरदार महिलांसाठी वसतीगृह बांधण्यात येणार आहे. एकाच भूखंडावर वृद्धाश्रम आणि वसतीगृहाच्या स्वतंत्र इमारती बाधण्यात येणार आहेत.

सात मजली वृद्धाश्रम आणि वसतीगृह बांधण्यासंबंधीचा प्रस्ताव मंडळाने तयार केला आहे. हा प्रस्ताव लवकरच उपाध्यक्षांसमोर मंजुरीसाठी ठेवण्यात येणार आहे.

अक्रॉस मुंबई यह सप्ताहिक स्वामी संजय तेजसिंग खिमेसरा के लिए मुद्रक, प्रकाशक- संजय मंगेश भैरे द्वारा सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, अमिन इंडस्ट्रीयल इस्टेट, सोनावाला क्रॉस रोड-२, नियर जवाहर नगर, फाटक ब्रीज, गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३ से मुद्रित और राजेंद्र पार्क, बिल्डिंग नं. २/२०, चौथा माला, स्टेशन रोड, गोरेगांव (प.) मुंबई -४००१०४ यहां प्रकाशित किया। संपादक - संजय मंगेश भैरे फोन : ०२२-४९७१९९३२ ईमेलः sanjay.bhaire@gmail.com RNI NO: MA HBIL/2016/68485